सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शनिवार, दि. १९ जुलै २०२५ वर्ष - तिसरे अंक १०७ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com







# महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी 'हरित वीज क्रांती'

## मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा, १० हजार कोटींची बचत होणार!

मुंबई : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेतील अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना एक महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे. लवकरच महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरेल, जे शेतकऱ्यांना हरित (ग्रीन) वीज पुरवेल. या निर्णयामुळे राज्याच्या शाश्वत विकासाला गती मिळेल आणि वीज खरेदीत १० हजार कोटी रुपयांची बचत होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.



फडणवीस म्हणाले की, राज्याच्या शाश्वत विकासासाठी एक सविस्तर 'ब्लू प्रिंट' तयार करण्यात आली आहे. सध्या राज्याची ५० टक्के वीज हरित ऊर्जा स्रोतांच्या माध्यमातून तयार केली जात आहे. पुढील पाच वर्षांत विजेचे दर कमी होतील, असे आश्वासनही त्यांनी दिले. यापूर्वी दरवर्षी ९.२० टक्क्यांनी विजेचे दर वाढत होते, परंतु आता दरवर्षी ते कमी होतील असे मुख्यमंत्री म्हणाले.

या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत, राज्यातील सुमारे ३० लाख कुटुंबांना विजेचे बिल येणार नाही, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. घरगुती वीज वापरणाऱ्या ग्राहकांना सौर मुक्ती दिली जाईल. तसेच, शेतकऱ्यांसाठी साडेसात अश्वशक्ती ऊर्जा वापरण्याचा निर्णय कायम ठेवला असून, यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात वीज उपलब्ध होईल.

या घोषणांमुळे राज्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक दोघांनाही मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. हरित ऊर्जेच्या वापरामुळे पर्यावरणावर सकारात्मक परिणाम होईल, तर वीज दरात कपात आणि मोफत वीज योजनेमुळे आर्थिक भार हलका होईल.




# २५८ खाजगी रुग्णालयांचे परवाने रद्द!

मुंबई : खाजगी आरोग्य क्षेत्रातील गैरव्यवहारांवर निर्णायक कारवाई करत, महाराष्ट्र सरकारने बॉम्बे नर्सिंग होम्स रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ चे उल्लंघन केल्याबद्दल २५८ खाजगी रुग्णालयांचे परवाने रद्द केले आहेत. राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर यांनी विधानसभेत ही घोषणा केली. या वर्षी केलेल्या दोन व्यापक तपासण्यांमध्ये हे उल्लंघन उघड झाले होते.

राज्यातील २३,३५४ खाजगी रुग्णालयांची तपासणी केली असता, त्यापैकी तब्बल ५,१३४ रुग्णालये कायद्याचे उल्लंघन करताना आढळली, ज्यात पायाभूत सुविधा, कर्मचारी संख्या, स्वच्छता, अग्निसुरक्षा, कचरा विल्हेवाट, बिलिंगमध्ये पारदर्शकता आणि तक्रार निवारण प्रणाली यांसारख्या मानकांचा समावेश होता.

या ५,१३४ रुग्णालयांना नियमांचे पालन करण्याच्या नोटिसा बजावण्यात आल्या होत्या, परंतु



पाठपुराव्याच्या तपासणीत २५८ रुग्णालये नियमांचे पालन करण्यात अपयशी ठरली, ज्यामुळे त्यांची नोंदणी रद्द करण्यात आली. अबिटकर यांनी स्पष्ट केले की, इतक्या मोठ्या प्रमाणावर तपासणी पहिल्यांदाच करण्यात आली असून, रुग्णालये कायदेशीर आणि नैतिक मर्यादेत कार्यरत आहेत याची खात्री करण्यासाठी सरकार दरवर्षी अशा तपासण्या करणार आहे.

आरोग्यमंत्र्यांनी खाजगी डॉक्टर आणि लहान आरोग्य सेवा चालकांच्या चिंताही मान्य केल्या, की सध्याचा कायदा मोठ्या रुग्णालये आणि डे केअर सेंटर्स व नर्सिंग होम्ससारख्या लहान सेटअपमध्ये फरक करत नाही. यावर उपाय म्हणून, सरकारने आगामी विधानसभा अधिवेशनात १९४९ च्या कायद्यात सुधारणा करण्याची योजना जाहीर केली आहे, ज्यामुळे लहान आस्थापनांसाठी अधिक वास्तववादी अनुपालन मापदंड तयार करता येतील.

## कामाच्या दबावामुळे बँक मॅनेजरची आत्महत्या

पुणे: बारामती शहरात गुरुवारी संध्याकाळी एका आत्महत्येच्या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. ती घटना म्हणजे, भिगवण परिसरात गुरूवारी मध्यरात्री बँक ऑफ बडोदामध्ये मुख्य प्रबंधक म्हणून पदभार संभाळणारे शिवशंकर मित्रा यांनी बँकेतच गळफास लावून आपले आयुष्य संपवले आहे. आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनि सुसाईड नोट देखील लिहिली होती. ज्यात त्यांनी कामाच्या अतिरिक्त दबावाला कंटाळून हा निर्णय घेत असल्याचे म्हंटले होते. बँक मॅनेजर हे पद अतिमहत्वाचे आणि प्रतिष्ठेचे मानले जाते. चांगली नोकरी, चांगला पगार आणि सन्माननीय वागणूक मिळत असतानाही शिवशंकर मित्रा यांनी आत्महत्येचा निर्णय घेतल्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. कामाचा भार असह्य झाल्यामुळे मानसिक नैराश्य येऊन आतापर्यंत अनेकांनी आत्महत्येचा निर्णय घेतलेला आहे, पण मॅनेजर पदावरील व्यक्तीने अशाप्रकारे जीवन संपवण्याची ही पहिलीच घटना आहे.




# मुंबई 'क्रिएटिव्ह इकॉनॉमी'चे जागतिक केंद्र होणार: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई: मुंबई ही देशाची 'एंटरटेनमेंट कॅपिटल' आहे आणि याच शहरातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'क्रिएटिव्ह इकॉनॉमी'साठी जागतिक पातळीवर पुढाकार घेण्याची घोषणा केली होती. ती घोषणा आज यशस्वीरित्या प्रत्यक्षात उतरली आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुंबई येथे १ ते ४ मे २०२५ दरम्यान वेव्हज् परिषदेचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले. या वेव्हज परिषदेच्या निष्कर्ष अहवालाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. त्याचप्रमाणे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी (आयआयसीटी) आणि एनएफडीसी कॅम्पसचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी केंद्रीय माहिती व प्रसारण, माहिती तंत्रज्ञान तसेच रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, सांस्कृतिक कार्य आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री ड.आशिष शेलार, मुख्य सचिव राजेशकुमार, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, केंद्रीय सचिव संजय जाजू तसेच प्रसून जोशी, साकेत मिश्रा, शेखर कपूर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई येथे झालेल्या वेव्हज् या भव्य आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी केंद्र सरकारच्या पुढाकाराचे कौतुक करत, मुंबई केवळ या कार्यक्रमाचे यजमान शहर नव्हते, तर ही एक चळवळ बनली असल्याचे सांगितले. क्रिएटिव्ह इकॉनॉमीशी संबंधित वेव्हज् इंडेक्सचे महत्त्व सांगताना मुख्यमंत्री म्हणाले की, या इंडेक्सची किंमत काही महिन्यांपूर्वी ९३,००० कोटी होती. आता ती १ लाख कोटींवर पोहोचली आहे. यावरून या क्षेत्राची झपाट्याने होत असलेली वाढ लक्षात येते. क्रिएटर्स इकॉनॉमीच्या पुढील टप्प्याला चालना देण्यासाठी महाराष्ट्र सरकारकडून १५० कोटींचा विशेष निधी मंजूर करण्यात येणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. वेव्हज् परिषद आता दरवर्षी किंवा दोन वर्षांनी मुंबईतच होईल. पुढील कार्यक्रम हा याहून भव्य असेल, याची हमी देत असल्याचेही त्यांनी सांगितले.

आयआयसीटी या संस्थेबाबत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आयआयसीटी केवळ प्रशिक्षण संस्था नसून एक 'आयकॉनिक डेस्टिनेशन' ठरेल. लोक इथे शिकण्यासाठीच नव्हे, तर पाहण्यासाठीही येतील. ही संस्था पुढील पिढ्यांसाठी क्रिएटिव्ह इकॉनॉमीचा केंद्रबिंदू बनेल. तसेच, त्यांनी 'वेव्हज' कार्यक्रमादरम्यान तयार करण्यात आलेल्या भारत पॅव्हेलियनचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, ही आपल्या सृजनात्मकतेच्या इतिहासाची एक सुंदर झलक आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सुचनेनुसार हे पॅव्हेलियन आता गुलशन बिल्डिंगमध्ये कायमस्वरूपी स्थापन करण्यात आले आहे. यामुळे मुंबईतील पर्यटनस्थळांत एक नवे आकर्षण स्थळ जोडले गेले आहे.

केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव मुंबईत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव टेक्नॉलॉजीच्या पहिल्या कॅम्पसच्या उद्घाटनप्रसंगी म्हणाले, ही केवळ सुरुवात असून, क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीसाठी आयआयटी-आयआयएम प्रमाणे एक संपूर्ण शैक्षणिक साखळी उभी करण्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची महत्त्वाकांक्षी कल्पना आहे. देशातील तरुणांसाठी नव्या संधी निर्माण करणारा हा उपक्रम आहे. क्रिएटिव्ह इकॉनॉमीमध्ये काम करणाऱ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञान, कौशल्ये आणि जागतिक दर्जाची साधने देण्याचा हेतू या संस्थेमागे आहे. 'आयआयसीटी'च्या स्थापनेसाठी आतापर्यंत  कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, मुंबई फिल्म सिटीमध्ये पुढील मोठा कॅम्पस उभारला जाणार आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### भरतीची सुवर्णसंधी

**धाराशिव, दि.१८ जुलै -**

महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. (मेस्को), पुणे यांच्या अधिपत्याखालील विविध साईटवर पुरुष व महिला सुरक्षा रक्षक पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे.या भरतीत माजी सैनिक, माजी सैनिकांची पत्नी,विधवा पत्नी तसेच माजी सैनिकांचे महिला व पुरुष पाल्य सहभागी होऊ शकतात. जिल्ह्यात ही भरती कंत्राटी पद्धतीने करण्यात येणार असून,निवड झालेल्या उमेदवारांना आकर्षक मासिक वेतन,दर सहा महिन्यांनी महागाई भत्ता वाढ,तसेच कामगार कायद्यानुसार ई.पी.एफ., ई.एस.आय.,ग्रॅज्युएटी यासारखे फायदे मिळणार आहेत.इच्छुक उमेदवारांनी दिनांक २३ जुलै २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत,सर्व आवश्यक मूळ कागदपत्रांसह जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,धाराशिव येथे संपर्क साधावा. जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय- ०२४७२-२२२५५७/७५८८५२७५५४ गंगाधर गायकवाड - ९४२२३०७५९३, बबन कोळी- ८०११४१४३६० असे आवाहन करण्यात आले आहे.

### लोकशाही दिनाचे आयोजन

**तुळजापूर, दि.१८ जुलै -**

तालुकास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याच्या प्रत्येक तिसऱ्या सोमवारी करणे बाबत निर्देशीत केल आहे. त्या अनुषंगाने तहसील कार्यालय येथे तालुकास्तरीय लोकशाही दिन दिनांक २१/०७/२०२५ वार सोमवार रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता लोकशाही दिनाचे आयोजन केले जाणार आहे. त्याअनुषंगाने लोकशाही दिनकरिता अर्जदार यांनी अर्ज विहित नमुन्यात १५ दिवस आधी दोन प्रतीत पाठविणे आवश्यक आहे. सदर लोकशाही दिनामध्ये अर्ज देताना त्यांनी संबंधित तालुक्यातील तिस-या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व सदर तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त् कालावधी होवून देखील कोणतीही कार्यवाही झाली नाही अशाच अर्जदाराने टोकन क्रमांकाच्या पावतीसह विहित नमुन्यात दोन प्रतीमध्ये अर्ज सादर करावा तसेच ज्या अर्जदाराने तालुकास्तरीय लोकशाही दिनात भाग घेतला नाही अशा अर्जदाराचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सुचित करण्यात येत आहे.

# ऑनलाईन गेमवर बंदी आणा : आ.कैलास पाटील

## कायदा करण्यासाठी केंद्राकडे पाठपुरावा करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासन... विधानसभेत आ.कैलास पाटील यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जुलै -**

ऑनलाईन गेमवर बंदी आणली पाहिजे अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी सभागृहात लक्ष्यवेधीद्वारे केली. राज्यांना त्यावर कायदा करता येत नाही त्यामुळे केंद्रीय पातळीवर कायदा करावा लागणार आहे. त्यासाठी राज्यसरकार केंद्रीय पातळीवर पाठपुरावा करत असून पुढेही करणार असल्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तरादरम्यान दिले. यावेळी आमदार पाटील म्हणाले की, मुख्यमंत्री महाराष्ट्र विकसित करण्याचा मानस बोलून दाखवतात. पण राज्यात तरुण पिढीसमोर एक नवीन संकट उभे राहिले असून ते म्हणजे ऑनलाईन गेमच. यामध्ये तरुण पिढी मोठ्या प्रमाणावर आहारी जात आहे.



यावेळी त्यांनी धाराशिव तालुक्यातील बावी गावच्या एक युवकांने किती टोकाचं पाऊल उचलले याकडे सभागृहाच लक्ष्य वेधले. बावी गावचा लक्ष्मण मारुती जाधव नावाच्या युवक ऑनलाईन गेमच्या आहारी गेला.

त्यानं स्वतःची शेती, घर देखील विकले. तरीही त्याच्यावरील कर्ज काही फिटले नाही. त्यामुळे त्यानं स्वतःच्या दोन वर्षाच्या मुलाची व गरोदर असलेल्या आपल्या पत्नीची हत्या केली. नंतर त्यानेही स्वतः संपवून घेतले. अश्या अनेक प्रकारच्या घटना या ऑनलाईन गेम मुळे राज्यभर घडत आहेत. त्यामुळे या गेमवर सरकारने राज्यात बंदी आणावी अशी मागणी आमदार पाटील यांनी केली.

ज्या पद्धतीने स्वर्गीय आर. आर. पाटील यांनी डान्सबारवर बंदी आणली अगदी तशाच पद्धतीने आपण देखील या ऑनलाईन गेमवर बंदी आणावी अशी अपेक्षा राज्यातील पालकांतून व्यक्त होत आहे. सरकार राज्यात ऑनलाईन गेमला परवानगी नाही असे सांगत असून याबाबत जनजागृती करावी लागेल असं म्हणत आहे.

पण परिस्थिती आता जागृती करण्याच्या पुढे गेली असून तेलंगना राज्यात ऑनलाईन गेमवर बंदी आहे तशी आपणही निर्णय घ्यावा अशी मागणी आमदार पाटील यांनी केली. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ऑनलाईन गेम ही मोठी अडचणीचा विषय बनला असून याबाबत सरकारचेही दुमत नाही.

तरुण पिढी मध्ये विशेषतः मध्यम वर्गीय कुटुंबातील मुले याच्या आहारी गेल्याच फडणवीस म्हणाले. त्यामुळे यावर नियमन करणे आवश्यक आहे. हा रोग गेल्या चार पाच वर्षापासून वाढत आहे.

केवळ केंद्राच्या माहिती तंत्रज्ञान काही नियम केले असले तरी यावर बंदी आणण्यासाठी कायदा करणे गरजेचे आहे. हा कायदा करण्याबाबत माहिती घेतली असता त्याचे राज्याला अधिकार नसून केंद्राला आहेत.

राज्याने कायदा केला तरी तो परिणामकारक ठरणार नसल्याच मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. जर कायदा प्रभावी करायचा असेल तर तो केंद्रानेच करायला हवा तसा पत्रव्यवहार देखील केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री यांच्याकडे केला आहे. केंद्र सरकार देखील कायदा करण्याच्या विचारात असून राज्य सरकार देखील याबाबत पाठपुरावा करत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# तुळजाभवानी मंदिर विकास आराखडा आढावा बैठक संपन्न

## जिल्हाधिकाऱ्यांनी केली विकास कामांची पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१८ जुलै -**

तुळजाभवानी मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी तयार करण्यात आलेल्या आराखड्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष किर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत मंदिर परिसरातील विविध विकासकामांचा प्रगती अहवाल सादर करण्यात आला तसेच भविष्यातील कामांची दिशा ठरवण्यात आली.

या बैठकीस श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रकाश अहिरराव, उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख, तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) अरविंद बोळंगे, पुरातत्व विभागाचे प्रतिनिधी, सवानी कन्स्ट्रक्शन कंपनीचे अधिकारी तसेच पुजारी मंडळांचे अध्यक्ष उपस्थित होते.



बैठकीदरम्यान मंदिर परिसरातील महत्त्वपूर्ण कामांवर चर्चा झाली. विशेषतः भवानी मंडपाच्या नूतनीकरणासाठी तयार करण्यात येत असलेल्या खांबांच्या गुणवत्तेची आणि बांधकामाच्या अचूकतेची जिल्हाधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. कामाचा दर्जा आणि डिझाईन हे पुरातत्वदृष्ट्या व धार्मिक महत्त्व लक्षात घेऊन केले जात असल्याची खात्री त्यांनी केली.

# हज, उमरा, यात्रेकरू सखावतखांन पठाण, यांचा वर्ग मित्राकडून सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१८ जुलै -**



कळंब येथील हाजी सखावतखांन सादतखांन पठाण हे हज यात्रेसाठी कळंब येथुन शुक्रवार १८ जुलै रोजी संध्याकाळी मुंबईकडे रवाना होत असून मुंबई येथुन रविवार २० जुलै रोजी सौदी अरेबियातील हज यात्रा मक्का-मदीना, उमरा साठी रवाना होत आहेत जीवन सफलतेसाठी मुस्लिम धर्मीयात हज यात्रा महत्वपूर्ण मानली जाते. एकूण ही यात्रा २० दिवसाची आहे. हज उमरा यात्रेसाठी रवाना होण्यापूर्वी सखावत खान पठाण यांचा वर्ग मित्र परिवातील अभय देवडा, प्रदिप मुंडे, नागनाथ घुले, शरद खंदारे,गौतम लोढा,विक्रम गायकवाड, माधवसिंग राजपूत, अशोक माळी, श्याम देशपांडे, ओंकार अंधारे, यांनी पठाण यांचा सत्कार केला.

# शिवसेना पुर्ण ताकदीनिशी लढविणार : शिवसेना शाखेच्या उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१८ जुलै -**

आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका शिवसेना पुर्ण ताकदीनिशी लढविणार असुन यासाठी शिवसैनिकांनी कामाला लागावे असे आवाहन शिवसेनेचे नेते सोमनाथ गुड्डे यांनी तुळजापुर तालुक्यात नव्याने स्थापन करण्यात आलेल्या शिवसेना शाखेच्या उदघाटन कार्यक्रमात बोलतांना केले आहे.

तुळजापूर तालुक्यातील राजकीय वातावरणात नवचैतन्य निर्माण करत शिवसेना (शिंदे गट) पक्षाच्या तीन नव्या शाखांचे उद्घाटन मोठ्या जल्लोषात पार पडले. मौजे सिंदफळ, कामठा व अपसिंगा या गावांमध्ये एकाच दिवशी पक्ष शाखांची स्थापना करण्यात आली. या उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने संपूर्ण परिसर भगवामय झाला होता.

हे उद्घाटन शिवसेनेचे पक्षप्रमुख व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पक्ष सचिव संजय मोरे यांच्या आदेशानुसार तसेच शिवसेनेचे उपनेते माजी आमदार ज्ञानराज चौगुले, सहसंपर्कप्रमुख भगवान देवकते, धाराशिव जिल्हाध्यक्ष मोहन पनुरे यांच्या मार्गदर्शनाखाली तर तालुकाध्यक्ष अमोल जाधव यांच्या नेतृत्वाखाली पार पडले.

शिवसेनेच्या या नविन शाखांचे उदघाटन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मोहन पनुरे, शिवसेनेचे नेते सोमनाथ गुड्डे व तालुका अध्यक्ष अमोल जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

या शाखा उदघाटनाच्या कार्यक्रमास या तीनही गावांतील ग्रामस्थ, युवक, महिला, नविन पदाधिकारी व शिवसेनेचे कार्यकर्ते यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिंदफळ, कामठा आणि अपसिंगा येथे शाखा सुरू केल्यामुळे तालुक्यातील इतर राजकीय पक्षांमध्ये खळबळ माजली असुन यामुळे तुळजापुर तालुक्यातील राजकारणात शिवसेनेची ताकद वाढली आहे.

यावेळी शिवसेनेचे नेते सोमनाथ गुड्डे, जिल्हाध्यक्ष गणेश जगताप, मीनाताई सोमाजी, रुपालीताई घाडगे, रेणुका शिंदे, राधा घोगरे, शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष गणेश नेपते, तुळजापुर शहराध्यक्ष बापुसाहेब भोसले, शहर उपाध्यक्ष रमेश चिवचिवे, नितीन मस्के, शहाजी हाके, नागेश भोसले, स्वप्निल सुरवसे, संभाजी नेपते, भुजंग मुकेरकर, संजय लोंढे, मोहन भोसले, सिंदफळ शाखेचे शाखाप्रमुख राहुल शिंदे, उपशाखाप्रमुख मनोज व्यवहारे, सचिव सागर लांडगे, कोषाध्यक्ष अक्षय धनके, कामठा शाखेचे शाखाप्रमुख सुधीर जमदाडे, उपशाखाप्रमुख सुधाकर माळी, सचिव लखन जमदाडे, कोषाध्यक्ष शरद रोकडे, अपसिंगा शाखेचे शाखाप्रमुख सुरेश सुरडकर, उपशाखाप्रमुख रविंद्र वडगावकर, सचिन तोडकरी उपस्थित होते.

# वृक्ष लागवड महाअभियानात सहभागी व्हा : रामकृष्ण जाधवर

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१८ जुलै -**

जिल्हाधिकारी किर्तीकिरण पुजार यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण धाराशिव जिल्ह्यात दिनांक १९ जुलै २०२५ रोजी एकूण १५ लाख वृक्षांची लागवड करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. या महाअभियानाचा एक भाग म्हणून उमरगा नगरपरिषद कार्यालयाच्या वतीने २२ जातींच्या एकूण १९,८०० रोपांची मियावाकी घनजंगल पद्धतीने लागवड केली जाणार आहे.

ही वृक्षलागवड उमरगा येथील बीज गुणांक केंद्रात ६० गुंठे क्षेत्रावर सकाळी ७ वाजता करण्यात येणार आहे. या उपक्रमात नागरिकांचा सक्रिय सहभाग अनिवार्य असल्याचे स्पष्ट करत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर यांनी शहरवासीयांना पर्यावरण संवर्धनासाठी पुढे येण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मतिमंद मुलींसाठी आरोग्य तपासणी, कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जुलै -**

तुळजाई प्रतिष्ठान संचालित स्वआधार मतिमंद मुलींचे बालगृह संलग्न शाळा,अळणी,विमानतळ रोड येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय आणि शासकीय रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने एक प्रेरणादायी आरोग्य तपासणी शिबीर व कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम नुकताच संपन्न झाला.

या उपक्रमाचे मार्गदर्शन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण स्वप्नील खटी यांनी केले.कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव भाग्यश्री पाटील होत्या.

प्रारंभी वृक्षारोपण, दीपप्रज्वलन व जीन मार्क इटार्ड यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.खरा तो एकचि धर्म,जगाला प्रेम अर्पावे या गीतावर मुलींचे नृत्य,स्वागत गीत आणि मराठवाडा मुक्ती संग्राम या पुस्तकासोबत औषधी रोपांचे अनोखे स्वागत उपस्थितांचे मन जिंकून गेले. संस्थेचे सचिव श्री.शहाजी चव्हाण यांनी प्रास्ताविक करत संस्थेच्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रमात ॲड. शुभम गाडे यांनी दिव्यांग व बालस्नेही योजनांवर मार्गदर्शन केले. ॲड.अमोल गुंड यांनी बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याची माहिती दिली, तर ॲड.अमोल वरुडकर यांनी बालकांचे हक्क व बाल न्याय कायद्यावर सखोल मार्गदर्शन केले. तहसीलदार डॉ.मृणाल जाधव यांनी शासकीय योजनांचा लाभ सर्व मुलींना देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे सांगितले.

जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी मुलींच्या हस्तकला वस्तू विक्रीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात जागा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.तसेच बालगृहाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामासाठी तातडीने लक्ष घालण्याचेही सांगितले. अध्यक्षीय समारोपात पाटील यांनी शासकीय योजनांचा पूर्ण लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन दिले. बालगृहातील सर्व मुलींची आरोग्य तपासणी करण्यात आली.

# पोलिसांनी लावला अवघ्या दोन दिवसात गुन्ह्याचा छडा

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१८ जुलै -**

लोहारा शहरातील डॉ. आंबेडकर चौकातील श्री जयलक्ष्मी ज्वेलर्स हे दुकान फोडुन चोरट्यांनी ४० हजार रुपये रोकडसह नवीन ५ किलो चांदी व ३ किलो चांदीची मोड, असा ७ लाख ८१ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना मंगळवारी पहाटे घडली होती. याप्रकरणी गुन्हा नोंद झाल्यानंतर लोहारा पोलिसांनी अवघ्या दोन दिवसात यातील एका चोरट्यास गुरुवारी पहाटे पुणे जिल्ह्यातील वारजे पोलिस ठाणे हद्दीतील माळेगाव येथे जाऊन पकडले.

शहरातील अविनाश माळी यांचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातील श्री जयलक्ष्मी माऊली ज्वेलर्स हे सोने चांदीचे दुकान मंगळवारी पहाटे ४ वाजायच्या सुमारास फोडुन चोरट्यांनी दुकानात लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे वायर काढुन हार्ड डिस्क काढण्यासाठी बॉक्सला छेडछाड केली होती.



तसेच सोकेश व काउंटरमध्ये ठेवलेले चांदीचे तयार व मोडीसाठी आलेले जुने दागिने, रोख रक्कम ४० हजार रुपये, असे एकुण ८ किलो चांदिचे दागिने व रोख ४० हजार रुपये घेऊन पोबारा केला. या प्रकरणी अविनाश फलसुंदर यांच्या फिर्यादीवरून लोहारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या चोरीच्या तपासकामी तीन पथकांची निर्मिती मंगळवारी सकाळीच करण्यात आली होती. त्यानंतर मंगळवारी रात्री खबर्याकडुन पोलीसांना चोरट्याचा माग लागतात तीन्ही पथके एकत्र करण्यात आली. यानंतर पोलिसांनी पाटण जिल्हा सातारा, चिपळूण जिल्हा रत्नागिरी, सांगोला, माळशिरस जिल्हा सोलापूर येथे शोध घेतला. यादरम्यान सांगोल्यातून MH 45 E 8458 या क्रमांकाची चारचाकी गाडी चोरी गेल्याचे समजले.

दरम्यान लोहार्यातही चोरी करताना चोरट्यांनी अशीच चारचाकी गाडी वापरल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्ट झाले होते.

त्यामुळे हेच चोरटे असल्याची खात्री पोलिसांना झाली. हे चोरी केलेल्या गाडीसह पुण्याच्या दिशेने दरोडा टाकण्यासाठी गेल्याची खबर पोलीसांना लागताच तेही चोरट्याच्या मागावर पुण्याच्या दिशेने रवाना झाले. तेथे पुणे जिल्ह्यातील वारजे पोलिस ठाण्याच्या हद्दीतील माळेगाव येथे एका घरावर दरोडा टाकत असताना लोहारा पोलीसांनी सोनुसिंग कपुरसिंग टाक रा.गायकवाड पाडा,

जिल्हा पालघर या आरोपीस चारचाकी गाडीसह ताब्यात घेतले असुन, अन्य चार आरोपी पळुन जाण्यात यशस्वी झाले.

या गाडीमध्ये लोहार्यातील चोरी केलेली चांदीही पोलीसांना सापडली या कामगिरी बदल नागरिकांतून पोलीस बांधवांच कौतुक करण्यात येत आहे,

# अण्णाभाऊ साठे यांची पुण्यतिथी काँग्रेसच्या वतीने साजरी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१८ जुलै -**



साहीत्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची पुण्यतिथी आज उमरगा येथील काँग्रेस भवनात उमरगा तालुका काँग्रेस कमिटी आणि युवक काँग्रेस धाराशिव यांच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करून साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुकाध्यक्ष अर्जुन बिराजदार होते. त्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.

यात्रसंगी धाराशिव जिल्हा मागासवर्गीय काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष संजय सरवदे, माजी नगरसेवक व शहराध्यक्ष उमरगा विजय दळगडे, युवक काँग्रेसचे धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष दादासाहेब गायकवाड, ॲड. इरफान जमादार, शहर कार्याध्यक्ष अभिषेक औरादे, काँग्रेस सेवादल तालुका अध्यक्ष बाबा मस्के, राजाभाऊ शिंदे, बालाजी गायकवाड, विजय तोरडकर, वाघमारेसर, चंद्रकांत मजगेसावकार, युवक काँग्रेस शहराध्यक्ष सोहेल इनामदार, जीवन सरपे, अमित रेड्डी, कुंभारमामा आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा आणि विचारांचा गौरव करण्यात आला. त्यांचे साहित्य, सामाजिक कार्य आणि श्रमिक वर्गासाठी त्यांनी दिलेले योगदान या वेळी वक्त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाचे आयोजन नेटके आणि शिस्तबद्ध करण्यात आले होते. उपस्थित मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

# ध्येय प्राप्तीसाठी वाचन अभ्यास व दृढीकरण महत्त्वाचे : दैवशाला हाके

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जुलै -**

जीवनातील ध्येय प्राप्तीसाठी वाचन, अभ्यास व दृढीकरण (सिंहावलोकन) महत्त्वाचे आहे. आपण वाचन करताना समजून घेणे, जास्तीत जास्त वेळ अभ्यास करणे आवश्यक आहे. वाचनातून आकलन किती झाले हे पाहण्यासाठी दृढीकरण (सिंहावलोकन) आवश्यक असते. आकलन करून आपल्यात निर्णय क्षमतेचा विकास झाला पाहिजे. सर्वात शेवटी मूल्यमापन होते. मूल्यमापनापर्यंत पोहोचण्यासाठी जीवनातील महत्त्वाच्या पायऱ्यावर वाचन, अभ्यास व त्याचे दृढीकरनाला महत्त्व देणे आवश्यक असते असे प्रतिपादन जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान महाराष्ट्र शासन आरोग्य सेवेमार्फत कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी श्रीमती दैवशाला



हाके, विस्ताराधिकारी, (गटशिक्षण कार्यालय, धाराशिव ) बोलत होत्या.

त्या पुढे म्हणाल्या की विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर स्पर्धा परीक्षेला सामोरे गेले पाहिजे. ५ वी व ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवणे आवश्यक आहे. स्पर्धेत टिकायचे असेल तर टीव्ही, मोबाईल पासून थोडे दूर राहिले राहणे आवश्यक आहे. स्पर्धा परीक्षेसाठी सुरुवातीपासूनच प्रयत्न करणे आवश्यक आहे.

स्पर्धा परीक्षेची माहिती असावी. शाळा आपल्या गुणवत्तेसाठी हमेशा प्रयत्नशील असते त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा.

विद्यालयातील परिपाठातील प्रार्थना मंत्रमुग्ध करणारी आहे मात्र या प्रार्थनेचा अर्थ समजून घेऊन गुरुचा आदर करणे तेवढेच महत्त्वाचे आहे. या प्रार्थनेतून जीवनात सत्यता उतरवणे आवश्यक आहे. जीवनात ध्येय ठेवून वाटचाल करावी अशी अपेक्षा यात्रसंगी व्यक्त केली.

अवैद्यकीय पर्यवेक्षक यु आर शिंदे यांनी स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबर समाज जागृतीचे अनमोल कार्य करावे.

कुष्ठरोग निर्मूलनासाठी आपल्या जवळील व्यक्तींना कुष्ठ रोगाची लक्षणे व उपाय यांची माहिती अवश्य द्यावी. अंगावर फिकट पांढरा, तांबूस रंगाचा, न खाजणारा, लालसर चट्टा, चट्ट्यावरील केस विरळ होणे, हातापायाला मुंग्या येणे, कानाच्या पाळ्या जाड होणे, कानाच्या पाळीवर गाठी येणे, चेहरा तेलकट, भुवईचे केस विरळ होणे, हातापायास बधिरपणा येणे किंवा अचानक जखमा होणे ही कुष्ठरोगाची लक्षणे असू शकतात. मात्र त्यावरील निदान व नियमित बहुविध औषधोपचाराने कुष्ठरोग पूर्णतः बरा होऊ शकतो.

प्रत्येकानी वैयक्तिक स्वच्छतेवर लक्ष दिले पाहिजे.

सखोल माहिती कुष्ठरोगासंबंधी विद्यार्थ्यांना यात्रसंगी दिली. विद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी वैद्यकीय कर्मचाऱ्याकडून करण्यात आली.

यात्रसंगी डॉ.आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष दादा कोळगे, माजी जि.प.सदस्य रामदास कोळगे, माजी ग्रा.प.सदस्य राजनारायण कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कपाळे, इंदिरा गांधी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.गणेश शेटे तर आभार पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे यांनी केले.

# जनसुरक्षा कायदा रद्द करण्याची काँग्रेसची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१८ जुलै -**

कळंब तालुका आणि शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने उपविभागीय अधिकारी कळंब यांच्यामार्फत महाराष्ट्र राज्यपालांना निवेदन सादर करून जनसुरक्षा कायदा तात्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, हा कायदा लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांवर आणि संविधानिक अधिकारांवर गदा आणणारा असून, अभिव्यक्ती स्वातंत्र्य व आंदोलनाच्या हक्कांवर बंधने घालतो.काँग्रेस पक्षाने स्पष्ट केले आहे की हा कायदा कोणत्याही परिस्थितीत मान्य केला जाणार नाही. लोकशाही वाचवण्यासाठी प्रत्येक स्तरावर संघर्ष करू आणि जनतेमध्ये जनजागृती करू.

यावेळी उपस्थित कळंब तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष पांडुरंग कुंभार, कळंब शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष शशिकांत निरफळ, महिला काँग्रेसच्या ज्योती सपाटे, युवक काँग्रेस जिल्हा सचिव भूषण देशमुख, ओबीसी विभाग जिल्हा उपाध्यक्ष विश्वंभर मैंदाड,

जिल्हा सरचिटणीस कलीम तांबोळी, तालुका उपाध्यक्ष संजय पवार, महिला तालुका काँग्रेस अध्यक्ष अंजली ढवळे, कळंब शहर महिला अध्यक्ष अर्चना नखाते, पृथ्वीराज देशमुख, युवक काँग्रेस शहराध्यक्ष इरफान बागवान, किसान काँग्रेस अध्यक्ष शीलानंद शिनगारे, युवक विधानसभा उपाध्यक्ष रोहित कसबे , मागासवर्गीय सेल अध्यक्ष बबन हौसलमल, कामगार सेल अध्यक्ष विशाल वाघमारे, दत्ता अंबिरकर,नासर शेख, विद्यार्थी काँग्रेस चे मकसूद शिकलगार, रोहन कोठावळे, गौरव रोडे, समीर बागवान, विकास मुंढे, राजू बागवान, वैशाली धावारे, स्नेहल कदम , संध्या कदम, विमल खराडे, ज्योती जगताप, जयश्री महामुनी, श्वेता स्वामी व इतर काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

## अग्रलेख...

# खेळीमेळीतील पेचप्रसंग!

भारतीय जनता पार्टी हा केवळ सत्ताकारण करणारा नव्हे, तर माणसे जोडणारा पक्ष आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. तसे नसते, तर गेल्या सहा वर्षांत महाराष्ट्राच्या राजकारणात जे काही घडले त्यामुळे या पक्षास जबर फटका सोसावा लागला, ते सारे विसरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उबाठा गटाचे नेते उद्धव ठाकरे यांना विधिमंडळात दिलेल्या ऑफरची चर्चा सुरू झाली नसती. सहा वर्षांपूर्वी उद्धव ठाकरे यांनी जनादेश नाकारून, युती धर्मास तिलांजली देऊन भाजपाला सोडचिठ्ठी दिली आणि काँग्रेस-राष्ट्रवादीशी संगनमत करून महाविकास आघाडी या नावाने अनैतिक सरकार स्थापन केले. भाजपावर विरोधात बसण्याची वेळ आली. देवेंद्र फडणवीस हे विरोधी पक्षनेते म्हणून विधिमंडळात दाखल झाले. 'पार्टी विथ डिफरन्स' असे भाजपाच्या राजकारणाचे वर्णन केले जाते. अनेकदा विरोधक त्याची खिल्ली उडवितात. पण भाजपा हा सूडाच्या आणि कुरघोडीच्या अलिकडच्या राजकारणाहून वेगळाच पक्ष आहे. या पक्षात मतभेदास जागा नाही, हे फडणवीस यांनी बुधवारी विधिमंडळात दाखवून दिले. सहा वर्षांपूर्वी युतीला सोडचिठ्ठी देऊन महाविकास आघाडीच्या मुख्यमंत्रिपदाच्या मोहास बळी पडणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी विश्वासघात केला, त्याचा विसर आपल्याला कधीही पडणार नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी त्यानंतर कितीतरी वेळा सांगितले असले, तरी उद्धव ठाकरे यांचे टोमणे, आरोप, आव्हाने आदी सारे काही विसरून फडणवीस यांनी बुधवारी सभागृहात दाखविलेला दिलदारपणा पक्षाचे वेगळेपण अधोरेखित करणारा ठरतो. भाजपाचा कार्यकर्ता माणसे जोडतो, हे त्यांनी त्या वक्तव्यातून दाखवून दिले. आता भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुतीकडे भक्कम बहुमत असल्याने व जनादेशाचा कौलही महायुतीच्याच पाठीशी असल्याचे वारंवार स्पष्ट होत असल्याने, भाजपा वा महायुतीस विरोधात बसण्याची वेळ येण्याची शक्यता नाहीच; मात्र विरोधात बसलेल्या कोणासही भाजपासोबत येण्याची व पर्यायाने सत्तेत सहभागी होण्याची संधी आहे, हे फडणवीस यांचे वक्तव्य राजकीयदृष्ट्या मिश्कीलपणाचा अस्सल वैदर्भीय ठसका असला, तरी ठाकरे यांच्यासाठी ते नेमके वर्मावर ठेवले गेलेले बोटच होते, यात शंका नाही. विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या सदस्यत्वाची मुदत २९ ऑगस्ट रोजी संपत आहे. त्याआधीच्या अधिवेशनाच्या अखेरच्या सत्रात दानवे यांना निरोप देण्याचा कार्यक्रम सभागृहात संपन्न झाला. त्या निमित्ताने दानवे यांच्या कार्यशैलीची स्तुती करताना फडणवीस यांनी जुन्या घडामोडींच्या आठवणी पुसून टाकत खेळीमेळीच्या वातावरणात त्यांना शुभेच्छा दिल्या आणि विरोधात असलेल्यांना सत्तेसोबत येण्याची संधी असते, या वास्तवाची खुमासदार आठवण करून देत ठाकरे यांना महायुतीसोबत येण्याचे आमंत्रण दिले. माध्यमांत आणि राजकीय वर्तुळात त्याची जोरदार चर्चा सुरू झाली आणि ठाकरे यांना त्यावर प्रतिक्रिया देणे भागच पडले, तेव्हा अशा गोष्टी खेळीमेळीने घ्यायच्या असतात, अशी सारवासारव करणारे प्रत्युत्तर ठाकरे यांनी दिले. मात्र, फडणवीस यांच्यावरील पक्षाच्या वेगळेपणाचे संस्कार आणि ठाकरे यांच्या राजकारणाचा इतिहास पाहता, फडणवीस यांनी दिलेले आमंत्रण ही त्यांच्या वैरभावरहित राजकारणाची अभिनंदनीय बाजू आहे, असेच म्हणावे लागेल. दुसऱ्या बाजूने ठाकरे यांच्या वाटचालीचा इतिहास पाहता ते तडजोड करणारच नाहीत, असे कोणीच छातीठोकपणे सांगू शकणार नाही, हेही वास्तव आहे.

ठाकरे यांच्या शिवसेनेत गेल्या चार-पाच दशकांत अनेकदा फूट पडली. बाळासाहेबांवर निष्ठा असलेले अनेक कट्टर कार्यकर्ते पक्षाबाहेर पडले. राज ठाकरे, छगन भुजबळ, गणेश नाईक, नारायण राणे, एकनाथ शिंदे यांच्यासारखे बिनीचे मोहरे पक्षाबाहेर पडले, पण प्रत्येक फुटीमागे केवळ सत्तालोभाचे कारण नव्हते. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वशैलीवरील नाराजी आणि नेतृत्वावरील अविश्वास हेच प्रत्येक फुटीमागचे कारण होते, हा इतिहास आहे. तरीही एकनाथ शिंदे यांच्या बंडाने पक्षाची पुरती वाताहत झाल्याने, त्याचे खापर फोडण्यासाठी निमित्त शोधणे सुरू होते. त्यातूनच त्यांचा 'खोके सिद्धान्त' जन्माला आला. उलट नारायण राणे यांच्यासारख्या नेत्याने तर मातोश्रीवरच खोक्यांचा आरोप करून खळबळ उडवून दिली होती. आम्ही खोके आणि पाकिटे दिली नसती तर मातोश्री उभी राहिली नसती, असा थेट आरोप त्यांनी एका जाहीर सभेत केला होता. त्यामुळे पक्षातील नेत्यांना भाजपाने पळविले हा केवळ कांगावा होता. उद्धव ठाकरे यांच्या कार्यशैलीस कंटाळूनच हे नेते बाहेर पडले ही वस्तुस्थिती होती, हे लपून राहिलेले नाही. या संदर्भाचाच धागा पकडून बुधवारी विधान परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गमतीने ठाकरे यांना चिमटा काढला. आता तुम्हालाही इकडे येण्याची संधी असून तुम्ही आलात तर वेगळा विचार करू, अशी थेट ऑफरच फडणवीस यांनी दिल्याने, भविष्यातील राजकारणाचा मागोवा घेण्याची चढाओढ राजकीय वर्तुळात आणि विश्लेषकांत सुरू झाली आहे. फडणवीस यांनी गमतीने दिलेला हा देकार ठाकरे मात्र गांभीर्याने घेणार का, यावरही चर्चा सुरू झाली आणि ठाकरे यांच्या सत्तेच्या तडजोडींचा इतिहासही उगाळला गेला. तसे नसते, तर सत्तेचा स्पष्ट जनादेश असतानाही, केवळ मुख्यमंत्रिपदाचा देकार मिळाला म्हणून युतीचे संकेत धाब्यावर बसवून उद्धव ठाकरे महाविकास आघाडीसोबत गेले असते का, असा प्रश्नही या चर्चेच्या निमित्ताने अधोरेखित झाला आहे.

केवळ उद्धव ठाकरेच नव्हे, तर महाराष्ट्राच्या राजकारणातील भाजपेतर पक्षांमधील फुटीच्या इतिहासालाही सत्ताकारणाचीच किनार आहे. ज्या राजकीय पक्षांतून अन्य महत्त्वाचे नेते जेव्हा जेव्हा बाहेर पडले तेव्हा त्यांनी सत्तेच्या वळचणीचाच आसरा घेतल्याची अनेक उदाहरणे महाराष्ट्राने अनुभवलेली आहेत. राष्ट्रीय राजकारणात राहिलेले काही प्रादेशिक नेतेही सत्तेच्या तडजोडी करताना महाराष्ट्राने पाहिले आहे. भाजपा हा अशा राजकारणातील अपवाद आहे असे म्हणावे लागेल. सत्ता गमावल्यानंतर अनेक नेते तळ्यात-मळ्यात करू लागतात, सत्तेच्या सोबतीने राहण्यासाठी वैचारिक तडजोडी करतात, असेही दिसते. भाजपाचे वैचारिक संस्कार असलेल्या कार्यकर्त्यांमध्ये मात्र सत्तेसोबत किंवा सत्तेविना अशा कोणत्याही राजकीय परिस्थितीचा परिणाम होत नाही, हे या पक्षाचे वेगळेपण आहे. सत्ता नसतानाही भाजपाचे कार्यकर्ते पक्षाशी एकनिष्ठ राहतात, राष्ट्रहितासाठी सत्ता हे या पक्षाच्या कार्यकर्त्यांवरील संस्कार असल्याने, माणसे जोडणे व माणसांचे धागे जोडत पक्ष मजबूत करणे ही या पक्षाची राजनीती आहे. म्हणूनच विपरीत परिस्थितीतही भाजपाचे कार्यकर्ते किंवा नेत्यांमध्ये अन्य नेत्यांप्रमाणे पक्षांतराच्या प्रवाहात वाहून गेलेले सहसा दिसत नाहीत. त्यामुळेच भाजपा हा 'पार्टी विथ डिफरन्स' या बिरूदास पात्र असलेला पक्ष ठरतो. सत्ता हे या पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचे अंतिम ध्येय नसते. म्हणूनच विरोधी पक्षात राहूनही देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या पदास न्याय देत राज्याच्या हितासाठी सरकारशी केलेला संघर्ष महाराष्ट्रास पाहावयास मिळाला. सत्तेविना राहूनही राष्ट्रकार्य करता येते, हा या पक्षाचा संस्कार त्यांनी अंमलातही आणला. सत्ता नसलेल्या, विरोधात असणाऱ्या अन्य पक्षांना सत्तेसोबत येण्याची संधी असते, हे त्यांचे उद्धव ठाकरे यांना उद्देशून केलेले विधान शंभर टक्के सत्यच आहे. पण भाजपामध्ये तसे राजकारण करणारा नेता अभावानेच आढळतो. उलट, सत्तेशी जवळीक साधण्यासाठी कोणत्याही वैचारिक तडजोडी करण्यास अनेक नेते मागेपुढे पाहात नाहीत, अशीही अनेक उदाहरणे असून खुद्द ठाकरे यांच्या राजकारणातही याचेच प्रतिबिंब दिसते. कदाचित हे ओळखूनच देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरेंनाच सत्तेसोबत येण्याचे आमंत्रण दिले असावे. फडणवीस यांच्या या वक्तव्याची अनेक उलटसुलट अंगांनी चर्चा होईल. ठाकरे यांनी केलेल्या विश्वासघाताच्या राजकारणाचा विसर पडला का, असा प्रश्नही अनेकांस पडू शकेल, पण भूतकाळावर पांघरूण घालून भविष्यकाळाला वळण देण्याची ही कथित खेळीमेळीची खेळी अनेकांना बुचकळ्यात पाडणारी ठरेल, हे मात्र खरे आहे. फडणवीस यांनी टोलविलेल्या या चेंडूवर खेळायचे की तो सोडून द्यायचा, हे ठरविण्यासाठी राजकीय अनुभव पणाला लावावा लागेल, हे मात्र खरे.

## प्रासंगिक

# कट्टरपंथीयांचे वाढते बळ हा धोका

**प्रा. जयसिंग यादव**

आरक्षणाच्या आंदोलनानंतर हसीना शेख यांचे सरकार उलथवून टाकल्यानंतर हंगामी सरकारचे प्रमुख डॉ. युनूस यांनी सहा महिन्यांमध्ये निवडणूक घेण्याचे आश्वासन दिले होते. आता एक वर्ष झाले, तरी निवडणुका झालेल्या नाहीत. युनूस यांच्या हाती बांगलादेशचा कारभार सोपवणारेच आता त्यांच्यावर नाराज झाले आहेत. 'आधी सुधारणा, नंतर निवडणुका' असा युनूस यांचा प्रयत्न होता; परंतु विरोधी पक्षांनीच आता त्यांच्यावर दबाव आणायला सुरुवात केली आहे. बांगलादेशवर १६ वर्षे सत्ता राखणाऱ्या अवामी लीगच्या नेत्या हसीना बांगलादेशमध्ये परतू शकत नाहीत. एका आदेशाद्वारे १४०० आंदोलकांची हत्या केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. त्यांना त्यासाठी दोषी धरले असून, फाशीची शिक्षाही सुनावली जाण्याची शक्यता आहे. बांगलादेशची न्यायव्यवस्था आता कट्टरपंथीयांच्या हाती आहे. तिथले सरकार त्यांच्याच हातचे बाहुले बनले आहे. हसीना यांचा पक्ष निवडणुकीच्या रिंगणातून बाहेर फेकला गेल्यासारखी स्थिती आहे. आपल्या काळात त्यांनी पाकिस्तानशी संबंध असलेल्या कट्टरपंथीयांच्या पक्षावर बंदी घातली होती. बांगलादेशचे हंगामी सरकार आणि तिथल्या सर्वोच्च न्यायालयाने बंदी उठवल्याने त्या निवडणुकीला सामोऱ्या जाऊ शकतात. किंबहुना, तशी तयारी त्यांनी सुरू केली आहे. त्यामुळे बांगलादेशमधील वातावरण तापले आहे. देशातील सार्वत्रिक निवडणुकांसाठी सर्व राजकीय पक्षांनी तयारी सुरू केली आहे. १६ वर्षांनंतर शेख हसीना यांच्या वर्चस्वाखाली न होणाऱ्या या निवडणुकीत कोण सत्ता मिळवेल असा प्रश्न प्रत्येक जण विचारत आहे. देशातील वर्तमानपत्रांनीही यावर सर्वेक्षण सुरू केले आहे.

अशाच एका सर्वेक्षणामुळे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांची चिंता वाढली आहे. सर्वेक्षणात 'बांगलादेश नॅशनल पार्टी' (बीएनपी) च्या खालिदा झिया यांच्या पक्षाला सर्वाधिक मते मिळताना दिसून आली आहेत, तर युनूस यांच्या जवळच्या आंदोलकांनी स्थापन केलेल्या राष्ट्रवादी पक्षाला तिसऱ्या क्रमांकावर स्थान मिळताना दिसत आहे. 'सानेम' या वृत्तपत्राने देशातील तरुण मतदारांची मते आजमावून केलेल्या या सर्वेक्षणात 'बीएनपी'ला ३९, जमात पक्षाला २२ तर राष्ट्रवादी पक्षाला १६ टक्के मते मिळताना दिसून आली आहेत. याशिवाय, इतर धार्मिक पक्षांना ४.५९ टक्के, जातीय पक्षाला ३.७७ टक्के आणि इतर पक्षांना ०.५७ टक्के मते मिळण्याचा अंदाज आहे. सर्वेक्षणामध्ये ५० टक्के तरुण देशाच्या आर्थिक स्थिरतेबाबत समाधानी आहेत तर ३५ टक्के तरुण देशाच्या कायदा आणि सुव्यवस्थेबद्दल चिंतेत आहेत. तथापि, राजकीय बदलाच्या शक्यतांबद्दल तरुण निराश आहेत. देशात सत्ता हाती घेताना मोहम्मद युनूस यांनी सहा महिन्यांमध्ये निवडणुका घेण्याबद्दल म्हटले होते. वाढत्या दबावामुळे, युनूस यांनी निवडणुका घेण्याचा निर्णय घेतला; परंतु त्यांच्या जवळच्या सहकाऱ्यांनी स्वतःचा राजकीय पक्ष काढला. गेल्या वर्षी विद्यार्थी चळवळींचा चेहरा असलेले युनूस यांचे जवळचे सहकारी नाहिद इस्लाम यांनी राष्ट्रवादी पक्ष स्थापन केला असून निवडणुका लढवण्याची तयारी करत आहेत. त्यानंतर मानले जात होते की, राष्ट्रवादी जिंकली तर देशाची सत्ता सध्याच्या अंतरिम सरकारकडेच राहील; परंतु सर्वेक्षणात तरुणांना राष्ट्रवादी पक्ष आवडत नाही, असे दिसून आले. देशातील 'जमात-ए-इस्लामी' या कट्टरपंथी संघटनेची नोंदणी पुनर्संचयित होणे आणि तिला निवडणूक लढवण्याचा मार्ग मोकळा होणे ही भारतासाठी चिंतेची बाब आहे. बांगलादेशमधील शेख हसीना सरकारच्या बंडानंतर एकापाठोपाठ घडणाऱ्या घटना भारतासाठी सकारात्मक नाहीत. बांगलादेशचे काळजीवाहू सरकार केवळ पाकिस्तान आणि चीनशी संबंध वाढवण्यात गुंतलेले नाही, तर त्यांच्या देशात कट्टरपंथी घटकांना प्रोत्साहन देण्यातही गुंतले आहे. याचे ताजे उदाहरण म्हणजे 'जमात-ए-इस्लामी'ला निवडणूक लढवण्याची परवानगी मिळणे. हे स्पष्ट झाले आहे की, सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश काळजीवाहू सरकारशी सहमत होण्यास तयार आहेत. वस्तुस्थिती अशी आहे, की 'जमात-ए-इस्लामी'ने विद्यार्थ्यांच्या चळवळीला पूर्ण पाठिंबा दिला होता. ही तीच संघटना आहे, जिच्यावर बांगलादेश मुक्ती युद्धादरम्यान पाकिस्तानला मदत केल्याचा आणि मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांचा आणि नरसंहाराचा आरोप होता. या आरोपांमुळे तिच्या सहा प्रमुख नेत्यांना फाशी देण्यात आली होती. बांगलादेशचे लष्करप्रमुख अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांच्यावर लवकरच निवडणुका घेण्यासाठी दबाव आणत आहेत, यावर समाधान मानता येत नाही, कारण बांगलादेशमध्ये एकामागून एक कट्टरपंथी व जिहादी विचारसरणीच्या संघटनांवरील बंदी उठवण्यासोबतच दहशतवादी कारवायांसाठी तुरुंगात शिक्षा झालेल्यांनाही सोडून देण्यात येत आहे. यावरून स्पष्ट होते की, लष्करप्रमुखांना कट्टरपंथी घटकांनी डोके वर काढण्याबाबत कोणतीही अडचण नाही.

शेख हसीना यांनी कट्टरपंथी 'जमात-ए-इस्लामी'वर बंदी घातली होती; परंतु युनूस यांनी गेल्या वर्षी सत्ता हाती घेताच ही बंदी उठवली. शेख हसीनांविरुद्धच्या तथाकथित विद्यार्थी चळवळीत 'जमात'ने मोठी भूमिका बजावली. या संघटनेवर चळवळीतील हिंदूंना लक्ष्य करण्याचाही आरोप होता. हे आरोप दूर करण्यासाठी जमात स्वतःचे नाव बदलत आहे. यापूर्वी बांगलादेशी न्यायालयाने संघटनेचा प्रमुख नेता अझहरुल इस्लाम याला सुनावलेली शिक्षा रद्द केली. २०१४ मध्ये त्याला मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली होती; परंतु युनूस सत्तेत आल्यानंतर त्याच्यावरील खटला नव्याने चालवून शिक्षा रद्द करण्यात आली. भारताचा विरोधक म्हणून 'जमात-ए-इस्लामी बांगलादेश'ची ओळख आहे. १९७१ च्या युद्धात पाकिस्तानी सैन्याने बंगालींवर अत्याचार केले असूनही या संघटनेने पाकिस्तानला पाठिंबा दिला. इतकेच नाही, तर त्यांनी पाक सैन्याला नरसंहार आणि बलात्कार करण्यात मदत केली. सत्तेत येताच शेख हसीना यांनी 'जमात'वर दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असल्याचा आरोप करत चौकशी सुरू केली. हसीना यांचे आरोप खरे ठरले आणि 'जमात'वर बंदी घालण्यात आली. आता, बांगलादेशमध्ये हसीना यांचे राज्य नसताना 'जमात'राजकारणात वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहे. या कामी त्यांना पाकिस्तानकडून पाठिंबा मिळत आहे. युनूस सत्तेत येताच पाकिस्तानशी सौहार्दपूर्ण आणि मजबूत संबंधांचा पुरस्कार करत आहेत. त्यांचीही भूमिका पाकिस्तानच्या समर्थनाची आहे. अशा परिस्थितीत युनूस आपली सत्ता वाचवण्यासाठी 'जमात'ने दाखवलेल्या मार्गाचे अनुसरण करत आहेत; जेणेकरून त्यांना 'जमात'चा पाठिंबा मिळत राहील.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# विळखा ओळखा...

जग वेगाने बदलत आहे, तंत्रज्ञान गतीने प्रगत होत आहे, इंटरनेटने माहितीचे दरवाजे उघडले. मात्र, या सगळ्याच्या केंद्रस्थानी असलेली नवी पिढी हळूहळू अनेक विळख्यात अडकते आहे. हे विळखे फक्त आर्थिक किंवा सामाजिक नाहीत तर मानसिक, भावनिक, तात्त्विक, तांत्रिक, कौटुंबिक, नैतिकही आहेत. शाळा किंवा कुटुंबातून जे शिकवले जात होते, ते आणि त्यापेक्षा नको तेही समाज माध्यमातून मिळते आहे. चॅट जीटीपी तुम्हाला काय हवंय ते तुम्ही विचार करण्यापूर्वी तुमच्या पुढे वाढून ठेवते. मेंदूचे काम आता फक्त हातातील मोबाईलला जपून ठेवण्यापर्यंतच मर्यादित झाले आहे. नवीन पिढी आपसूकच नव्या विळख्यात अडकते आहे. अलिकडच्या काही वर्षांमध्ये वर्धेसारख्या शांत जिल्ह्यात गुन्हेगारी प्रवृत्तीने तोंड वर काढले आहे. सात-आठ वर्षांपूर्वी वर्धेतील प्रसिद्ध औषध विक्रेत्याच्या अल्पवयीन मुलाचा गांजा ओढण्याच्या कारणातून खून झाला होता. गेल्या दोन महिन्यात 'गांजा' आणि 'एमडी' विक्री करणाऱ्यांवर कारवाई सुरू झाली आहे. यात बऱ्याच जणांवर गुन्हे दाखल झाले, अटकही झाली. गंभीर विषय पुढे आहे- या गांजा विक्री करणाऱ्यांमध्ये अटक झालेल्यांमध्ये दोन-तीन युवक हे महाविद्यालयीन असून चोरीत अल्पवयीन मुलांचा वापर केला गेला. महाविद्यालयीन युवकांवर गांजा विक्रीची वेळ का यावी किंवा अल्पवयीन मुलांना चोरीसारख्या घटनांमध्ये सहभाग का घ्यावा वाटला, याचे चिंतन होईल तेव्हा होईल. पण, निष्कर्ष काढण्याची वेळ उंबरठ्यावर आलेली आहे. आता काही कुटुंबांनाही हा विळखा बसला आहे. तो श्रीमंतांपासून सुरू झाला. गरिबांमध्ये पोहोचला आणि आता मध्यमवर्गीयांना आवळतो आहे. समाज दुभंगला (मतलबी झाला) आणि आता विळख्याचे प्रकारही वाढू लागले आहे. आधी दारू वगैरे हेच व्यसन होते; आता हा विळखा करकचल्या जातोय. तंत्रज्ञान अपरिहार्य आहेच; पण त्याचे दुष्परिणामही नाकारता येणार नाहीत. मोबाईल आणि समाज माध्यम एक व्यसन झाले आहे. लहान वयातच मोबाईल मिळतात. संवाद, शिकणे, करमणूक, फेसबुक, इन्स्टाग्राम, रील्स, टिक-टॉक यांसारख्या माध्यमांमुळे बाह्य जगापेक्षा आभासी जगात जास्त वेळ घालवू लागले. मुलं शांत बसावी, न रडता जेवावी यासाठी त्यांच्या डोळ्यापुढे मोबाईल दिला गेला. आता तो त्यांच्या हातात आणि डोक्यात गेल्याने लहान मुलंही विळख्यात अडकू लागले आहेत. समाजमाध्यमांचे खूळ डोक्यात गेलेल्यांना लोक काय पोस्ट करतात, कसे दिसतात, किती लाईक्स मिळतात, हे महत्त्वाचे झाल्याने तोही एक विळखाच! १५ ते २५ वयोगटातील मुलांमध्ये नैराश्य वाढू लागल्याने आत्महत्येचे प्रमाण वाढते आहे. तज्ज्ञांच्या मते घरात कुटुंबामध्ये संवाद कमी झाले. दोन दिवसांपूर्वीच नागपुरातील घटना समाज व्यवस्थेच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारी आहे. घरात सासू नकोच या शब्दावर सून बाहेर निघाली आणि सासू कायमची घराच्या बाहेर निघाल्यानंतरच ती घरात पोहोचली. हा अजून नवीन विळखा समाज व्यवस्थेचा कणा मोडणारा ठरत आहे. या सर्व विळख्यात सर्वात जीवघेणा विळखा कोणता असेल तर तो शिक्षण! आपली शिक्षण पद्धती परीक्षा आणि गुणांच्या विळख्यात अडकली असल्याने विद्यार्थ्यांना त्यातून फटकताच येत नाही आणि आमची शैक्षणिक संस्था कशी दर्जेदार शिक्षण देते यातच गुरफटली म्हणजेच विळख्यात सापडलेली आहे. पालकांना अतिशय महत्त्वाकांक्षांनी विळखा घातला. त्यामुळे हव्या नको त्या शिकवण्यांवर भर दिला जातो. मुलांना स्वतःच्या आवडी, कलांचा शोध घेण्याची संधीच मिळत नाही आणि पालकही त्यांच्या मनाचा विचारही करीत नाहीत. पालक आपल्या इच्छा त्यांच्यावर थोपतात. शिकवण्या, हॉस्टेल, आदींवर प्रचंड खर्च होतो. शैक्षणिक संस्था दुकानदारी झाल्याने त्यांना पालकांच्या खिश्यांचा अंदाज येत नाही. शैक्षणिक, सामाजिक स्पर्धेतून पुढे आर्थिक विळखा आवळला जातो. विचार, भाषा, तंत्रज्ञानातील फरकामुळे संवाद कमी झाल्याने पिढ्यांमध्ये एक दरी निर्माण झाली. त्यातून दुरावा, मतभेद निर्माण होऊन विभक्त कुटुंब ही एक समस्याही समाज व्यवस्थेच्या उद्ध्वस्तकरणाला विळखाच म्हणावा लागेल. संयुक्त कुटुंबातून विभक्त आणि आता ती अणू कुटुंब तयार होऊ लागले. आता समाजात नवीन एक फंडा आलेला आहे. तो कदाचित बॉलिवूडमधून आलेला दिसतो. दोन-चार वर्षांत विवाहबंधनात असलेल्या दाम्पत्याला 'लेकुरवाळे' व्हायचे नसल्याचीही बाब गंभीर आहे. आधी 'हम दो हमारे दो' नंतर 'एक' आता तर 'मूल नकोच'चा विळखा समाजाला आवळतो आहे. कुटुंब व्यवस्थेला छेद देणारा आहे. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे वडीलधाऱ्यांचा सल्ला संपला. आधाराची कोणालाच गरज राहिली नाही. जिव्हाळा पैशांमध्ये मोजला जाऊ लागला. त्यातून नैतिक विळखा वाढत चालला आहे. पालक, शिक्षक, समाज, शासन आणि युवकांनी वेळेवरच विळखा ओळखण्याची गरज आहे. कचरा जसा वाऱ्यासोबत उडतो तसेच काही लोकं ज्या दिशेला वारा वाहतो त्याच दिशेला पळताना दिसतात. प्रत्येक वाहून नेणारी नदी नसते, कधी कधी तो नालाही असतो... नदी-नाल्यातले अंतर ओळण्याची क्षमता निर्माण करा...

९८८१९०३७६५

## दखल

# शरद पवारांनी भाकरी फिरवली

**मोरेश्वर बडगे**

शरद पवारांनी आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अखेर भाकरी फिरवली आहे. राष्ट्रवादीचे प्रदेश अध्यक्ष जयंत पाटील यांच्या जागी विधानपरिषदेचे आमदार शशिकांत शिंदे यांची नियुक्ती केली आहे. तसं पाहिलं तर हे अपेक्षितच होतं आणि आवश्यकही होतं. गेली सात वर्षे जयंत पाटील पक्ष सांभाळत आहेत. अलिकडच्या लोकसभा निवडणुकीत त्यांच्या राष्ट्रवादीने आठ जागा जिंकल्या होत्या. मात्र विधानसभेत त्यांना अवघ्या दहा जागांवर समाधान मानावे लागले होते. जयंत पाटील पवारांचे खास विश्वासू असले, तरी अलिकडे पक्षातल्या तरुण रक्ताकडून त्यांना त्रास सुरू झाला होता. 'जयंत पाटील भाजपाला अंगावर घेत नाहीत, गुडीगुडी करतात' असे सांगत रोहित पवारांचा त्यांच्याशी सुप्त संघर्ष सुरू होता. पाटीलही वैतागले असणार. 'मला मोकळं करा' असं जयंत पाटलांनी शरद पवारांना मागेच पक्षाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात म्हटलं होतं. पण हे एवढं सोपं नव्हतं. पाटील नाहीत तर मग कोण? रोहित पवार, जितेंद्र आव्हाड आणि राजेश टोपे यांच्या नावाची चर्चा होती. आमदार रोहित पवार हा सध्या राष्ट्रवादीतला आक्रमक चेहरा आहे. मात्र, ते शरद पवारांच्या नात्यात येतात. कन्या सुप्रिया सुळे खासदार असताना घरातल्याच आणखी एकाला मोठं करणं शरद पवारांना परवडणारं नव्हतं. आमदार जितेंद्र आव्हाड यांना पुढे आणता आलं असतं. पण तेही आक्रमक स्वभावाचे आणि बोलायला फटकळ आहेत. शिवाय ओबीसी आहेत. मराठा आरक्षणाचा मुद्दा तापला असताना आव्हाड यांचे नाव मागे पडते. सर्वांना सांभाळून घेईल असा एक चेहरा म्हणजे माजी मंत्री राजेश टोपे आहेत. कोरोना काळात त्यांनी केलेल्या कामाची आजही आठवण काढली जाते. मात्र, टोपे मराठवाड्यातून येतात. पश्चिम महाराष्ट्रात जीव असलेल्या राष्ट्रवादीचा सेनापती बाहेरून कसा द्यायचा? त्यामुळे नव्या चेहऱ्याचा शोध अखेर शशिकांत शिंदे यांच्यापाशी थांबला. नावात 'राष्ट्र' असले, तरी पश्चिम महाराष्ट्राबाहेर जाण्याची फारशी धडपड शरद पवारांनी केली नाही. निवडणूक आल्या की साखर कारखानदार, शिक्षणसम्राट अशी गब्बर माणसं पकडायची, ५-५० जागा खिशात टाकायच्या, त्या जोरावर सरकारमध्ये घुसायचे असाच शरद पवारांचा खाक्या राहिला. नरेंद्र मोदी आल्यापासून पवारांना ब्रेक लागला. हक्काची माणसं सोडून जाऊ लागली. भाकरी फिरवताना शरद पवारांना गेल्या २६ वर्षांत एवढा कधी त्रास गेला नव्हता.

६१ वर्षे वयाचे शशिकांत शिंदे सातारा जिल्ह्यातले आहेत. मराठा समाजाचे आहेत. चार वेळा माथाडी कामगारांचे नेते आहेत. पवारांनी सांगितले म्हणून त्यांनी उदयनराजे भोसले यांच्याविरुद्ध लोकसभेची निवडणूक लढवली होती. फक्त ३२ हजार मतांनी हरले होते. सध्या विधानपरिषदेत पक्षाचे





मुख्य प्रतोद आहेत. एवढा समर्पित नेता कुठून मिळणार? विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर पक्षाला गळती सुरू झाली आहे. चांगले चांगले नेते भाजपामध्ये जात आहेत. त्यामुळे शिल्लक कार्यकर्त्यांमध्ये चलबिचल आहे. अशा हवेत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत आहेत. ग्रामीण भागात आपली ताकद टिकवण्यासाठी शरद पवारांना या निवडणुका जिंकणे अत्यावश्यक आहे. पक्षाला पुन्हा एकदा उभारी देण्याचे आव्हान पवार आणि त्यांच्या नव्या अध्यक्षापुढे आहे. वयोमानानुसार पवार थकले आहेत. पावसात सभा करण्याचे दिवस संपले. मात्र त्यांच्यात आजही प्रचंड इच्छाशक्ती आहे. दोन वर्षांपूर्वी पुतण्याने पक्ष पळवला असताना आता खऱ्या अर्थाने त्यांच्या नेतृत्वाचा कस लागणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होईपर्यंत जयंत पाटलांनी थांबावे, अशी शरद पवारांची इच्छा होती. मग जयंत पाटलांनी घाई केली का? त्यांना कुठे जायचं आहे? जायचं झालं तरी ते जाऊ शकतील? आमदारांच्या अपात्रतेचा खटला सुप्रीम कोर्टात आहे. प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांच्याच नावाने तो आहे. त्यामुळे पाटील शरद पवारांना सोडू शकत नाहीत. तरीही त्यांच्या विषयी संशयाचं वातावरण आहे. त्यांच्यातला आणि रोहित पवार यांच्यातला सुप्त संघर्ष हे उघड गुपित आहे. पाटील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अंगावर घेत नाहीत हा रोहितदादाचा राग आहे. पण पक्षाला गळती लागली असताना फडणवीसांना ठोकून काय मिळणार? असा पाटलांचा सवाल आहे. संघटना भक्कम झाल्याशिवाय फडणवीसांशी लढता येणार नाही, असे पाटील यांना वाटते. जुन्या आणि नव्या फळीत उघड मतभेद आहेत. तरीही ते लपवण्याची धडपड का सुरू आहे ते कळायला मार्ग नाही. जयंत पाटील यांनी केव्हाच राजीनामा दिल्याची बातमी तीन दिवसांपूर्वीच फुटली. पण कोणीही बोलायला तयार नव्हते. जितेंद्र आव्हाड यांच्यापासून तो थेट सुप्रिया सुळे यांच्यापर्यंत साऱ्यांनी कानावर हात ठेवले होते. निरोप समारंभात सारे डोळ्यात पाणी आणून बोलले खरे. मात्र सारेच पाटलांना कंटाळले होते हे लपून राहिले नव्हते. तब्बल सात वर्षांपासून नेते-कार्यकर्ते जयंत पाटलांना झेलत आहेत. किती झेलणार? शरद पवारांचे चांगले दिवस होते तोपर्यंत खपून गेले. आता मोदी आणि फडणवीस यांच्या युगात पदोपदी संघर्ष आहे. त्यात ठोस असं काही हाती लागत नसल्याने साऱ्यांचीच चिडचिड वाढणे स्वाभाविक आहे. 'अध्यक्षपद सोडले तरी पक्ष सोडणार नाही' असे जयंत पाटील यांनी जाहीर केले आहे. मात्र सध्याच्या राजकारणात कोण कधी आणि कुठे जाईल हे कोणीच सांगू शकत नाही. जयंत पाटील हे शरद पवारांचे निष्ठावंत. पण काय मिळालं? साधं उपमुख्यमंत्रिपदही मिळालं नाही. अजित पवारांना ते सिनिअर आहेत. पण काका घरात पुतण्यालाच झुकते माप देत गेले. पहाटेचा शपथविधी मोडल्यानंतर महाविकास आघाडीचा प्रयोग झाला. त्या सरकारमध्ये आपल्याला उपमुख्यमंत्री केले जाईल, अशी जयंत पाटलांना आशा होती. तसं काही झालं नाही. उलट बंड करून आलेल्या पुतण्याला उपमुख्यमंत्रिपद देण्यात आले. आघाडीचे सरकार अडीच वर्षांत कोसळले. त्या नंतरच्या घडामोडीत तरी आपल्याला विधानसभेतले विरोधी पक्षनेतेपद मिळेल, असा जबरदस्त विश्वास पाटलांना होता. तिथेही त्यांना धक्का बसला. तरीही त्यांनी शरद पवारांना का धरून ठेवले हे कोडं आहे.

जयंत पाटील हे दिवंगत नेते राजारामबापू यांचे सुपुत्र. विदेशात इंजिनीअरिंगचे शिक्षण घेत असताना वडिलांचे निधन झाल्याने जयंतराव सारे सोडून मायदेशी परतले. पुढे राजकारणात शिरले. जयंत पाटलांचे विशेष म्हणजे त्यांनी कधी टोकाचे राजकारण केले नाही. सुसंस्कृत पण मिश्कील स्वभाव. 'सीएम मटेरियल' असलेला हा नेता चुकीच्या पक्षात खपला. अलिकडे फडणवीस यांच्याशी त्यांची जवळीक वाढल्याचे बोलले जाते. फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात फक्त एक जागा रिकामी आहे. ती खास जयंत पाटील यांच्यासाठी फडणवीसांनी राखून ठेवल्याचे बोलले जाते. पाटील भाजपासोबत येऊ शकतात. तसेही राष्ट्रवादीत राहण्यालायक आता उरले आहे तरी काय? राजकारणात काहीही होऊ शकते. या महिन्यात देशाच्या पातळीवर राजकीय मोठ्या उलथापालथी होणार आहेत. शरद पवार उद्या 'एनडीए'सोबत आले तर आश्चर्याचा धक्का बसू नये. आणखी चार वर्षे मोठ्या निवडणुका नाहीत. पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. म्हणजे ग्रामीण भागांच्या निवडणुका आहेत. या निवडणुका पक्षीय पातळीवर लढवल्या जात नाहीत. वातावरण निर्मिती महत्त्वाची असते. या पृष्ठभूमीवर नव्या टीमला सोबत घेऊन लोकांपुढे जाण्याचा शरद पवारांचा प्रयोग यशस्वी होईल?

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### घुसखोरांना हाकललेच पाहिजे

राष्ट्रीय निवडणूक आयोग आता देशभरातील मतदारांची तपासणी करून मतदारयाद्यांची पडताळणी करणार असल्याची बातमी वाचण्यात आली. निवडणूक आयोगाने घेतलेला हा निर्णय अत्यंत स्वागतार्ह आहे. गेल्या अनेक वर्षांपासून भारतातील विविध राज्यांमध्ये बेकायदेशीर घुसखोरी प्रचंड वाढल्याचा आरोप सातत्याने केला जात आहे. बांगलादेशी, पाकिस्तानी, रोहिंग्या आणि इतर अनेक देशांतील घुसखोर भारतात कित्येक वर्षांपासून वास्तव्यास आहेत. इतकेच नव्हे तर भारत सरकारच्या विविध योजनांचा लाभ सुद्धा घेत आहेत. काही शहरांमधून तर त्यांनी आपापले क्षेत्र निर्माण केले आहे आणि घुसखोरांच्या वस्त्या बनवल्या आहेत. स्थानिकांवर दादागिरी करून दहशत निर्माण करणे आणि आपापले साम्राज्य प्रस्थापित करून गुन्हेगारी करणे हाच त्यांच्या उपजीविकेचा मार्ग झाला आहे. बेकायदेशीर धंदे करतानाच अनेक गुन्हेगारी, देशविरोधी कृत्यांमध्येही त्यांचा समावेश असल्याचे दिसून आले आहे. आपला भारत देश म्हणजे जागतिक निर्वासितांसाठी धर्मशाळा झाली आहे. आओ-जाओ घर तुम्हारा अशी भारताची अवस्था झाली आहे. घराचा उपभोग भाडोत्र्याने घ्यावा आणि घरमालकाने रस्त्यावरून जाताना हे आपले घर आहे, असा पोकळ बडेजाव मारावा, तशी भारतीयांची अवस्था झाली आहे. यावर कठोर उपाय करणे अत्यावश्यक आहे. बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या घुसखोरांना शोधून त्यांच्या देशात परत पाठवणे, याला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक आहे. केंद्र सरकारने याची गंभीर दखल घेऊन पावले उचलली पाहिजेत.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### लोकप्रतिनिधींवर मतदारांचा अंकुश असणे गरजेचे

सध्या बरेच लोकप्रतिनिधी कायदा हातात घेणे, जनतेला मारहाण करणे, विधानसभा आणि विधान परिषदेत एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करीत राहणे इ . नेहमी करीत असतात. यातच बराच वेळ फुकट जातो. त्यामुळे विकासाची कामे होत नाहीत. आपण जर चांगले वागलो नाही तसेच लोकोपयोगी विकासाची कामे केली नाहीत तर मतदार आपल्याला पुढील निवडणुकीत निवडून देणार नाहीत असे लोकप्रतिनिधींना वाटले पाहिजे. परंतु तसे होत नाही म्हणजे याला मतदारच जबाबदार आहेत. लोकप्रतिनिधींना आपण काहीही केले तरी मतदार आपल्यालाच निवडून देणार असे वाटत असते. आणि तसे होते देखील. त्यामुळे मतदारांचा लोकप्रतिनिधींवर वचक राहिलेली नाही. अजून देखील देशात लोकशाहीचा प्रयोगच सुरू आहे. अमर्याद संपत्ती असलेल्यांची येथून पुढे होणाऱ्या कोणत्याही निवडणुकीत मतदार निवडच करणार नाहीत. हेच योग्य राहील. तसेच लोकप्रतिनिधींना परत बोलावण्याची तरतूद कायद्यामध्ये असणे गरजेचे आहे. असे केल्यासच मतदारांचा लोकप्रतिनिधींवर अंकुश राहील.

**ॲड. बळवंत रानडे**/९८८१४७३५८०

### इजा बिजा तिजा!



उबाठा सेना आणि मनसे यांच्यात युती व्हावी म्हणून संजय राऊत हे फारच उतावीळ झाले आहेत! २०१९ मध्ये उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाच्या लालसेने हिंदुत्वप्रेमी मतदारांशी गद्दारी केली आणि त्यांनी व आदित्य ठाकरे यांनी १०, जनपथला जाऊन लोटांगण घालून हिंदुत्वाला सोडचिठ्ठी दिली. मराठी अस्मिता गुंडाळून ठेवली. तेव्हापासून तत्कालीन शिवसेनेच्या हिंदुत्वप्रेमी मतदारांत चलबिचल होतीच. त्या वेळी मृतवत् झालेल्या मूळ शिवसेनेचे, एकनाथ शिंदे यांनी बंड करून पुनरुज्जीवन केले. तत्कालीन शिवसेनेचे प्रवक्ते असलेले संजय राऊत यांच्या तोंडाळपणामुळे त्या बंडास हातभारच लागला होता! खरे तर ते तत्कालीन शिवसेनेचेच प्रवक्ते असताना महाविकास आघाडीचे प्रवक्ते असल्याच्या थाटात बोलत होते आणि घटक पक्षांना अडचणीत आणत होते. त्यामुळे नंतर अजित पवार यांनी जे बंड केले त्याचेही काही श्रेय राऊतांच्या तोंडाळपणाला आहे! (दरम्यान काँग्रेस पक्षालाही त्यांचा उपद्रव असह्य झाल्याने नाना पटोले यांनीही तुम्ही चोंबडेपणा करू नका असे राऊतांना जाहीरपणे सुनावले होते!) तेव्हा राऊत यांनी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस फुटण्यासंदर्भात इजा आणि बिजा केल्यावर आता मनसेच्या बाबतीत तिजा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारण संजय राऊत ही एक पनवती आहे, जाईल तिथे वाटोळेच करणार!

**अविनाश वाघ**/९३२२९९६२४३

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# विविध प्रलंबीत मागण्यांसाठी परिचारीकांचे काम बंद आंदोलन

## पहिल्याच दिवशी रूग्णालयातील आरोग्य व्यवस्था कोलमडली



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जुलै**

परिचारीकांच्या वेतनातील त्रुटी दूर करणे तसेच इतर प्रलंबीत मागण्यांसाठी दि १८ जुलै रोजी परिचारीका बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनामुळे आरोग्य व्यवस्थेवर ताण पडणार असल्याचे दिसत आहे.
महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटनेच्यावतीने राज्य सरकारकडे वेतनातील त्रुटी दूर करा, प्रशासकीय बदली, सेवा प्रवेश नियम, कंत्राटीकरण रद्द करा, केंद्र शासनाप्रमाणे भत्ता देण्यात यावा, १४०० रूपये, नर्सींग कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करावी, गणवेश भत्ता मिळाला पाहीजे, परिचारीकांना निवासासाठी व्यवस्था करण्यात यावी, बायोमेट्रीक हजेरी पध्दती बंद करावी, जन आरोग्य योजनेंतर्गत सप्टेंबर २०१८ पासून परिचारीका संवर्गातील कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा, कंत्राटी पदभरती बंद करण्यात यावी, पदनाम नर्सींग ऑफीसर असे करण्यात यावे यासह इतर प्रलंबीत मागण्यांसाठी राज्यातील परिचारीकांनी दि १५ व १६ जूलै रोजी काळ्या फिती लावून काम केले आहे. दि १७ जुलै रोजी धरणे आंदोलन करण्यात आले. येथील शासकीय रूग्णालयाच्या आवारात परिचारीकांनी दि १८ जुलै पासून सर्व परिचारीका बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले आहे. परिचारीकांनी काम बंद आंदोलन केल्यामुळे रूग्ण सेवेवर त्याचा मोठा परिणाम होत असून अनेक वार्डात आता परिचारीका नसल्यामुळे संपूर्ण जबाबदारी डॉक्टर्सवर पडली आहे. तसेच रूग्णांची हेळसांड होण्याची भिती व्यक्त होत आहे. शासनाने परिचारीकेच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा अशी मागणी यावेळी संघटनेच्यावतीने करण्यात आली आहे. या आंदोलनात रागीनी जोशी, एस टापरे, विणकर, खंदारे, बलखंडे, शिंदे, तिंडेल, पहुरकर, बिना जॉर्ज, लोखंडे, परदेशी, दिंडे, टाले, बेंगाळ, नागरगोजे, दिपाली वाघमारे, रेखा वाघमारे, रेखा साळवे आश्विनी सोनवणे, मनिषा गुठ्ठे यांच्यासह जिल्ह्यातील परिचारीका सहभागी झाल्या आहेत.

# प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंच्या उपस्थितीत वसमतमध्ये शक्तीप्रदर्शन

## राष्ट्रवादीची स्थानिक स्वराज्य निवडणुकांची तयारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जुलै**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे दि १९ जुलै रोजी वसमत, हिंगोली दौऱ्यावर येत आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या दौऱ्याला मोठे महत्व आले असून वसमतचे आ. चंद्रकांत उर्फ राजू नवघरे यांनी वसमत विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादीचे प्राबल्य मजबुत ठेवण्यात यश मिळवले आहे. त्यांच्यासमोर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे मातब्बर माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर असतांना त्यांनी राष्ट्रवादी पकड मजबूत ठेवली आहे.
राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांचा वसमत येथे दौरा असून त्यांच्या स्वागतासाठी आ. राजू नवघरे यांच्या मार्गदर्शनात मागील आठवडाभरापासून वसमत विधानसभा मतदारसंघात जय्यत तयारी करण्यात आली आहे. हा दौरा पक्ष संघटना मजबूत करण्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा मानला जात आहे. यावेळी जिल्हास्तरीय कार्यकर्ता संवाद मेळावा आयोजित करण्यात आला आहे. मागील विधानसभा निवडणुकीत आ. राजू नवघरे यांनी तत्कालीन माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांना पराभूत करीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला उभारी दिली आहे. सर्व सामान्य शेतकऱ्याचा मुलगा, तरूण नेतृत्व आणि कार्यकर्त्यांना सांभाळणारा तसेच विकासाची दृष्टी असणारे नेतृत्व असल्यामुळे आ. नवघरे यांच्या मागे विधानसभा मतदारसंघातील सर्व जाती धर्माचे लोक उभे आहेत तसेच तरूणांची एक नवीन फळी उभी करण्याचे काम त्यांनी केले आहे. विधानसभा मतदारसंघात आरोग्य, शिक्षण तसेच शेतकऱ्यांसाठी पाणी मिळावे यासाठी बंधारे, सामाजिक उपक्रम राबवित आहेत. त्यांच्या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळत आहे.
आगामी ग्रामपंचायत, पंचायत समिती तसेच जिल्हा परिषद आणि नगर पालिका निवडणुकीत नवीन चेहऱ्यांना संधी देण्यासाठी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे थेट कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत. वसमत विधानसभा मतदारसंघात यावेळी राष्ट्रवादीची ताकद वाढली असून शिंदे शिवसेना, उबाठा शिवसेना तसेच भाजप आणि काँग्रेस या चारही पक्षांना या विधानसभा मतदारसंघात सक्षम नेतृत्व नसल्यामुळे याचा लाभही आ. नवघरे यांना निश्चितच मिळणार आहे.
प्रदेशाध्यक्ष खा सुनील तटकरे यांच्या स्वागताची जय्यत तयारी करण्यात आली असून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूतळ्याजवळ आसेगाव कॉर्नर येथून सकाळी ९ वाजता मोटारसायकल रॅली काढणार आहेत.

# शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणार– भोजे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जुलै**



हिंगोली तालुक्यातील लाभार्थ्यांना सर्व योजनांचा थेट लाभ मिळावा यासाठी प्रभावीपणे अंमलबजावणी करणार असल्याची प्रतिक्रीया नूतन गटविकास अधिकारी विष्णु भोजे यांनी दिली आहे.
येथील पंचायत समितीच्या नवीन इमारतीमध्ये नुकतचे पंचायत समितीचे कार्यालय कार्यान्वित झाले आहे. त्यानंतर गटविकास अधिकारी म्हणून विष्णु भोजे यांनी नुकताच पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी पदाचा पदभार स्विकारला आहे. पदभार स्विकारताच गटविकास अधिकारी भोजे यांनी पंचायत समितीतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना कामाची शिस्त लावली असून स्वत: कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून लाभार्थ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडीअडचणी समजावून घेत आहेत. नुकत्याच तालुक्यातील ७५० घरकुलाच्या प्रलंबीत पडलेल्या फाईलींचा निपटारा करीत त्यांनी पात्र लाभार्थ्यांना घरकुल मंजूर केले आहेत. त्यामुळे लाभार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. पंचायत समितीअंतर्गत ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, महिला, बचत गट तसेच इतर वैयक्तिक लाभाच्या सर्व योजनांचा लाभ लाभार्थ्यांना मिळवून देण्यासाठी प्रभावीपणे अंमलबजावणी करणार असून अधिकारी व कर्मचारी यांनाही समन्वय साधून काम करण्याचे आदेश गटविकास अधिकारी भोजे यांनी दिले आहेत.



**हिंगोली– जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनंतकुमार कुंभार यांची धाराशिव येथे बदली झाली असून शुक्रवारी त्यांचा कार्यालयाच्यावतीने निरोप समारंभ कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. अनंतकुमार कुंभार यांनी त्यांच्या कार्यकाळात उत्कृष्ट काम केले. यावेळी सामान्य प्रशासन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### शिवाजी महाविद्यालयात रोजगार मेळावा

हिंगोली– जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर व येथील शिवाजी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने हिंगोली जिल्ह्यातील नोकरी इच्छूक उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टिने मंगळवार (दि. २२) रोजी शिवाजी महाविद्यालय, हिंगोली येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यात मुथ्थुट फायनान्स हिंगोली, उत्कर्ष स्मॉल बँक वाशिम, क्लासिक टीव्हीएस मोटर्स हिंगोली, नवभारत फर्टीलायझर लि. छत्रपती संभाजीनगर, पगारीया ऑटो प्रा.लि.हिंगोली, पलटन सेक्युरिटी हिंगोली, क्रिडेट एक्सेस ग्रामीण कुटा हिंगोली, भारत फायनान्स लि. हिंगोली, एसबीआय लाईफ इन्शुरन्स हिंगोली, भारतीय जीवन विमा निगम हिंगोली, मारोती ऑटोमोबाईल हिंगोली, स्वतंत्र मायक्रो फायनान्स वाशिम अशा नामांकित कंपनी व हिंगोली जिल्ह्यातील शासनाचे विविध महामंडळ रोजगार मेळाव्यात सहभागी होणार आहेत. हिंगोली जिल्ह्यातील दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवीधर या शैक्षणिक अर्हतेनुसार २५० पेक्षा अधिक रिक्त पदे संकेतस्थळावर अधिसूचित केली आहेत. आपल्या शैक्षणिक पात्रतेनुसार पदांची खात्री करून ऑनलाईन अर्ज करून स्वत: मूळ कागदपत्रांसह शिवाजी महाविद्यालय, हिंगोली येथे मंगळवार, (दि. २२) रोजी सकाळी १० वाजता स्वखर्चाने उपस्थित राहावे. याबाबत काही अडचण आल्यास ०२४५६-२२४५७४ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त बा. सु. मरे यांनी केले आहे.

### रूपाली चाकणकर यांचा आज हिंगोली दौरा

हिंगोली– राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर ह्या दि. १८ व १९ जुलै, २०२५ रोजी हिंगोली जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रमाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. शुक्रवार, दि. १८ जुलै, २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता जालनावरुन हिंगोलीकडे प्रयाण. रात्री ८.३० वाजता शासकीय विश्रामगृह हिंगोली येथे आगमन व मुक्काम. शनिवार, दि. १९ जुलै, २०२५ रोजी सकाळी १० वाजता हिंगोली येथे वन स्टॉप सेंटरला भेट व आढावा. दुपारी १.३० वाजता हिंगोलीवरुन परभणीकडे प्रयाण.

### रविवारी हिंगोलीत गुरूपोर्णिमा उत्सव

हिंगोली– येथील संगीत साधना प्रतिष्ठानच्यावतीने दि २० जुलै रोजी गुरूपोर्णिमा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ६ वाजता शिवाजीनगर भागातील दत्त मंदिरात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरूवर्या संगीतरत्न अनुराधाताई नांदेडकर यांचे शास्त्रीय संगीत तसेच पुणे येथील तबला वादक विनय कडेल यांचा सोलो तबला वादनाचा आनंद घेता येणार आहे. तसेच संगीत साधना विद्यालयातील शिष्यमंडळी बहारदार गाणी सादर करणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महंत विनयदास महाराज तर उद्घाटक म्हणून माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. यावेळी प्रदेश कार्यकारणी सदस्य शिवाजी मुटकुळे, रा कॉ चे जिल्हाध्यक्ष बी डी बांगर, डॉ किशन लखमावर आदींची उपस्थिती असणार आहे.

# जिल्हा व सत्र न्यायालयात आंतरराष्ट्रीय न्याय दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जुलै**

तालुका विधी सेवा समिती व वकील संघाच्या संयुक्त विद्यमाने, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा तालुका विधी समितीचे अध्यक्ष टी. एस. अकाली यांच्या मार्गदर्शनाखाली आज जिल्हा व सत्र न्यायालयात आंतरराष्ट्रीय न्याय दिवस साजरा करण्यात आला. तसेच इतर विषयावर कायदेविषयक शिबीराचे आयोजन वकील संघ जिल्हा व सत्र न्यायालय, हिंगोली येथे करण्यात आले होते.
यावेळी प्रमुख मार्गदर्शक ॲड. साहेबराव सिरसाठ यांनी वाढती लोकसंख्या यावर होणारे दुष्परिणाम व त्यावर उपाय यावर उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले. ॲड. अजय उर्फ बंटी देशमुख यांनी न्याय दिवसानिमित्त मार्गदर्शन केले. तसेच दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर विनोद एम. मानखैर यांनीही उपस्थित पक्षकारांना मार्गदर्शन केले.
या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश टी. ए. अकाली यांनी आंतरराष्ट्रीय न्याय दिवस, वाढत चाललेली लोकसंख्या तसेच मध्यस्थीतून प्रकरणे निकाली काढल्यावर होणारे फायदे यावर सखोल मार्गदर्शन केले.
या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून बार कॉन्सील ऑफ महाराष्ट्र ॲन्ड गोवाचे सदस्य ॲड. सतीष देशमुख, वकील संघाचे अध्यक्ष ॲड. सुनिल भुक्तार हे होते. यावेळी दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर वि. म. मानखैर, मुख्य न्याय दंडाधिकारी अ. बा. कुरणे, सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर व्ही. व्ही. सावरकर, सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर पी. आर. पमनानी, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर डी. व्ही. भंडारी, तिसरे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर एस. एस. पळसुळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जिल्हा वकील संघाचे सचिव ॲड अखील अहेमद यांनी केले. तर आभार प्रदर्शन जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ॲड सुनिल भुक्तार यांनी केले. या कार्यक्रमास जिल्हा वकील संघाचे ज्येष्ठ विधीज्ञ तसेच पक्षकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दाताडा खुर्द येथील जमीन हडप करण्याचा प्रयत्न, सरपंचाची तक्रार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जुलै**

सेनगाव तालुक्यातील सुमारे १०० एकर जमीन मंडळ अधिकारी, तलाठी आणि ग्रामसेवक बनावट बक्षीसपत्र व मृत्युपत्र तयार करून हडप करण्याचा प्रयत्न करीत असून हा फेरफार रोखण्याची मागणी म्हाळशी येथील सरपंच साधना जनार्दन खडसे यांनी मंडळ अधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.
याबाबत निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, दाताडा खुर्द येथील गट क्रमांक ११/१ व १११/२ मधील १११/१ चे क्षेत्रफळ १४ हेक्टर ३२ आर व १११/२ मधील २४ हेक्टर ६२ आर हेक्टर क्षेत्रफळ हे नामे विठोबा संभाजी देवकर यांचे नावे असून ते सुभद्रबाई मारोती वाठोरे यांचे नावे करू पाहत असून सध्या फेरफार संदर्भात हालचाली करीत आहेत. त्यामध्ये गट क्रमांक १११/१ मधील १४ हेक्टर ३२ आर पैकी १३ हेक्टर ६६आर जमीन व १११/२ मधील २४ हेक्टर ४२ आर पैकी २२ हेक्टर ४२ आर एवढे क्षेत्रफळ बनावट बक्षीस पत्राद्वारे सुभद्राबाई मारोती वाठोरे यांचे नावे करीत आहेत. बक्षीसपत्रामध्ये विठोबा संभाजी देवकर यांचा मृत्यु दिनांक चुकीचा दर्शविलेला आहे. आणि बक्षीसपत्र सुध्दा बनावट असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.
सातबारामध्ये ही जमीन गावाच्या जनावरासाठी गाव मुखीया म्हणून सर्व पंचांनी विठोबा संभाजी देवकर यांच्या नावे करून दिलेली होती ती आजपर्यंत सातबारावर नोंद आहे.
सदरील वरील फेरफार हा सुभद्राबाई मारोती वाठोरे यांचे नावे न होता विठोबा संभाजी देवकर यांच्या वारस रामेश्वर विठोबा देवकर यांचे वारस सरस्वतीबाई रामेश्वर देवकर, भागवत रामेश्वर देवकर, ज्ञानेश्वर रामेश्वर देवकर यांचे नावे होणे कायद्याने योग्य आहे.
सदरील जमीन सुमारे १०० एकर असून या जमिनीवर अनेकांचा डोळा आहे. या व्यवहारात मंडळ अधिकारी, तलाठी तसेच ग्रामसेवकांसह अधिकारी देखील असल्याचा संशय व्यक्त होत आहे. सदरील जमीनीचा फेरफार थांबवून देवकर यांच्या वारसदाराला नियमाप्रमाणे नावे करावी अशी मागणी सरपंच साधना खडसे यांनी केली आहे.

# नागरिकांनी समाजमाध्यमे वापरतांना काळजी घ्यावी– जिल्हाधिकारी राहुल गुप्ता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ जुलै**

जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिक, खास करून महिला, महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींनी त्यांची समाजमाध्यमांची खाती ही द्विस्तरीय सुरक्षित ठेवून सायबर चोरट्यांपासून स्वत:ला सुरक्षित ठेवता येते. त्यासाठी खाती सुरक्षित ठेवण्यासोबतच नातेवाईकांशी संपर्क साधून खात्री केल्याशिवाय कोणतेही आर्थिक व्यवहार न करण्याचे किंवा बदनामीपासून वाचण्याचे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.
जिल्ह्यातील मोठ्या उच्चपदस्थ अधिकाऱ्याचे एक फेक समाजमाध्यम खाते तयार करण्यात आल्याची घटना नुकतीच घडली असून, त्यांचे फेक खाते संबंधित विभागाने तात्काळ बंद केले आहे. त्यामुळे नागरिकांनी तात्काळ आपापली खाती टू स्टेप व्हेरिफिकेशन करून सुरक्षित करावीत, असे आवाहनही जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.
सायबर चोर आपल्या नावाचे फेक खाते समाजमाध्यमांवर तयार करून आपल्या आप्तेष्टांना, नातेवाईकांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवून फसवणूक करू शकतात. तसेच आपले नातेवाईक आजारी आहेत. आपल्या खाते अपडेट करायचे आहे, केवायसी अपडेट करायची आहे किंवा इतरही काही कारणे सांगून आपली ओटीपीमार्फत फसवणूक केली जावू शकते. तसेच आपले फसबूक, ट्वीटर, इन्स्टाग्राम यासह विविध समाजमाध्यमांवर आपले छायाचित्र वापरून नवे खाते तयार करून आपल्या मित्रांना, नातेवाईकांना विविध कारणांच्या माध्यमातून पैशांची मागणी करू शकतात. त्यामुळे वेळीच सावध होऊन आपल्या नातेवाईकांशी थेट संपर्क साधून खात्री करून घ्यावी. त्यानंतरच पुढील आर्थिक वा इतर व्यवहार करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.
जिल्ह्यातील नागरिकांच्या व्हॉट्सअप क्रमांकावर पीएम किसान लिस्टच्या एपीके फाईल येत असून या लिंकवर क्लिक केल्यास ते हॅक होत आहेत. तसेच मोबाईलमध्ये असलेले फोन पे ॲप, गुगल पे ॲप तसेच बँकेचे इतर ॲप्लीकेशनही हॅक होत आहेत. त्यामुळे नागरिकांनी अशा फसवणुकीपासून सावध राहणे गरजेचे असल्याचे जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी सांगितले आहे.

सायबर चोरट्यांपासून नागरिकांनी घ्यावयाची काळजी

कोणत्याही एपीके फाईल मोबाईलमध्ये डाऊनलोड करू नका. तसेच थर्ड पार्टी प डाऊनलोड करू नयेत. आपल्या व्हॉट्सअप ॲपला टू स्टेप वेरिफिकेशन कोड लावून ठेवावा जेणेकरून ते दुसरीकडे उघडणार नाहीत. तसेच आपले इंस्टाग्राम अकाउंट, फेसबुक अकाउंट यांना प्रोफाईल लॉक करून ठेवावे. आपल्या बँक खात्याचा, यूपीआय, डेबीट कार्ड, क्रेडीट कार्डचा क्रमांक तसेच इतर कोणताही ओटीपी अनोळखी व्यक्तींना सांगू नये. आपले आर्थिक नुकसान झाल्यास तात्काळ १९३० अथवा संकेतस्थळावर जाऊन आपली तक्रार द्यावी अथवा जवळचे पोलिस स्टेशन किंवा सायबर सेल, हिंगोली येथे संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

ऑनलाईन गेमींग ॲपपासून सावधान..!

ऑनलाईन गेमच्या माध्यमातून पैसे जिंकण्याचे अमिष दाखविले जाते. या अमिषाला मोबाईलधारक बळी पडतो. तो मोह टाळावा. ॲप डाउनलोड करताना टो रीड ओटीपीची परवानगी दिली आहे. त्यामुळे आपल्या खात्यातून कल्पना नसतांनाही पैसे कमी होतात. अशा बनावट ॲपच्या माध्यमातून आपली फसवणूक टाळण्यासाठी असे मोफत ऑनलाईन गेमींग ॲप आपल्या मोबाईलमध्ये डाउनलोड करू नका.

प्रतिबंधात्मक उपाय

फेसबुक, व्हॉट्स प, ट्वीटर, इंस्टाग्राम इ. सोशल मिडीया प्लॅटफॉर्मवर अनोळखी व्यक्तींची मैत्री स्वीकारू नका तसेच आपली स्वतःची व कुटूंबाची माहिती शेअर करणे टाळा. ऑनलाईन मॅट्रीमोनीअल साईटवरील व्यक्तींना कोणतीही माहिती देऊ नका. आपल्या मोबाईलमध्ये अनोळखी ॲप डाउनलोड करू नका. अनोळखी फोन कॉलवर आपली वैयक्तीक अथवा आपल्या बँक खात्याची माहिती देऊ नका. तसेच आपल्या मोबाईलवर आलेला ओटीपी कोणालाही शेअर करू नका. अनोळखी व्यक्तीने पाठविलेला कोणताही क्यूआर कोड स्कॅन करू नका. इंटरनेटवरील नोकरीसंदर्भात विशेषतः विदेशातील नोकरी संधीच्या जाहिरातीची खात्री करा त्यांना आपली कोणतीही वैयक्तीक माहिती देऊ नका व आर्थिक व्यवहार करू नका, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## २१ जुलै रोजी महिला लोकशाही दिनाचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१८ जुलै -**

भारतीय जनता पक्षाची धाराशिव ग्रामिण तालुका कार्यकारणी जाह- ीर करण्यात आली आहे. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वाखाली व जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा तालुकाध्यक्ष निलकंठ पाटील यांनी धाराशिव तालुक्यातून कार्यकारणी जाहीर केली आहे.

या ४३ जनांच्या तालुका कार्यकारणी यामध्ये तेर येथील युवा कार्यकर्ते बालाजी श्रीमंत पांढरे यांची तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच तालुका चिटणीसपदी प्रविण कालिदास साळुंखे, तर तालुका कार्यकारिणी सदस्यपदी नवनाथ फुलचंद पसारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या निवडीचे नियुक्तीपत्र तालुकाध्यक्ष निलकंठ पाटील यांच्या स्वाक्षरीने काढण्यात आले. या निवडीचे तेरसह परिसरात होत आहे.



### संक्षिप्त वृत्त...



## अण्णाभाऊंनी अंधश्रद्धेविरुद्ध लिखाण केले : रामभाऊ लगाडे

**वाशी, दि.१८ जुलै -**

डॉ.अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून अंधश्रद्धेवर प्रहार करून अंधश्रद्धा निर्मूलन व्हावे म्हणून प्रयत्न केले ते म्हणाले पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती श्रमिकेच्या तळहातावर तरली आहे तसेच जग बदल घालून घाव सांगून गेले मज भीमराव बाबासाहेबांच्या विचाराने प्रेरित होते असे उद्गार जाणीव संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ लगाडे यांनी वाशी येथील साठे नगर मध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या ५६ व्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमात बोलताना केले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य महादेव क्षीरसागर जयंती कमिटीचे अध्यक्ष दीपक शिंदे, समाधान क्षीरसागर यांच्या हस्ते प्रतिमेची पूजन करण्यात आले यावेळी बापू गायकवाड, रामभाऊ लगाडे यांची भाषणे झाली. या कार्यक्रमाला समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता. कुदळे, धोंगडे यांनी परिश्रम घेतले.

## भाजपच्या महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षपदी छायाताई बोंदर

**कळंब, दि.१८ जुलै -**



भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षपदी छायाताई बोंदर यांची नियुक्ती करण्यात आल्याने, त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. आ.राणाजगजितसिंह पाटील, माजी मंत्री बसवराज पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, पूर्व ग्रामीण मंडळाचे अध्यक्ष दत्ताभाऊ साळुंखे, पश्चिम ग्रामीण मंडळाचे अध्यक्ष अरुण काका चौधरी, कळंब शहर मंडळाचे अध्यक्ष मकरंद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुका भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या अध्यक्षपदी छायाताई बोंदर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## रणसम्राट कबड्डी संघाच्या अध्यक्षपदी अक्षय करड

**तुळजापूर, दि.१८ जुलै -**



श्री तुळजाभवानी मंदिरा समोरील रणसम्राट कबड्डी संघाच्या नुकत्याच झालेल्या गणेश उत्सवाच्या बैठकीमध्ये नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. महंत मावजीनाथ बाबा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये सर्वानुमते अध्यक्ष म्हणून अक्षय करडे तर सचिव पदी समर्थ क्षीरसागर आणि केदार बळवंते यांची निवड करण्यात आली. उर्वरित कार्यकारणी मध्ये उपाध्यक्षपदी अर्जुन अमृतराव व संजय साळुंके, सहसचिव पदी ओम रोचकरी, कोषाध्यक्ष म्हणून स्वराज खुंटाफळे आणि अभय पलंगे तर मिरवणूक प्रमुख पदी सागर परमेश्वर व दिनेश कापसे यांची निवड करण्यात आली. यावेळी अविनाश गंगणे, दत्ता क्षीरसागर, सुनील रोचकरी, शुभम क्षीरसागर, विनोद सोंजी, ज्ञानेश्वर क्षीरसागर, अमोल ताकमोघे, उमेश क्षीरसागर, पुष्कराज शिंदे, समर्थ रोचकरी, ओम देरकर, यांच्यासह रणसम्राट कबड्डी संघाचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आणीबाणीत कारावास : नातेवाईकांसाठी अर्ज सादर करण्यास २५ सप्टेंबरपर्यंत मुदत

**धाराशिव, दि.१८ जुलै -**

आणीबाणीच्या काळात (१९७५-७७) कारावास भोगलेल्या व्यक्तींच्या मृत्यूनंतर त्यांचा हयात जोडीदार (पती/पत्नी) यांना शासनाकडून मानधन मिळण्याबाबतची अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. शासन परिपत्रक दिनांक १५.०९.२०१८ व त्यासोबतच्या परीशिष्टांनुसार,अशा लाभार्थ्यांनी आवश्यक अर्ज व शपथपत्र जिल्हा प्रशासनाकडे २५.०९.२०२५ पर्यंत सादर करावेत,असे स्पष्ट करण्यात आले आहे.यानंतर प्राप्त होणारे अर्ज कोणत्याही परिस्थितीत ग्राह्य धरले जाणार नाहीत. तालुकास्तरावरील सर्व कार्यालयांनी अशा अर्जदारांकडून आवश्यक कागदपत्रे वेळेत प्राप्त करून ती एकत्रितपणे जिल्हा प्रशासनाकडे सादर करण्याची कार्यवाही तात्काळ करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

### छोटी जाहिरात...

**टि.सी. हरवली आहे**

**प्रवीण अण्णाराव गुळवे** रा.गंगेवाडी ता. दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर या नावाची **दहावी पासची टीसी** तुळजापूर येथील नवीन बस स्थानक परिसरात हरवली आहे. तरी कोणास सापडल्यास खालील मोबाईल नंबरवर संपर्क साधावा.

**संपर्क : ९८८१८६६५०२**

### छोटी जाहिरात...

**टि.सी. हरवली आहे**

**प्रमोद साहेबराव राऊत,** रा. आंबेवाडी, ता.जि. धाराशिव या नावाची **इयत्ता बीए उत्तीर्णाची टी.सी.** तुळजापूर बसस्थानक येथे प्रवासादरम्यान हरवली आहे. तरी कोणास सापडल्यास खालील मोबाईल नंबरवर संपर्क साधावा.

**संपर्क : ९३७३४३८३५२**

# 'तारा' प्रकल्पासाठी इच्छुक उद्योजकांकडून ईओआय मागविणार

### मित्रचे उपाध्यक्ष आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जुलै -**

धाराशिव जिल्ह्याचा आर्थिक चेहरा मोहरा बदलत शेतकरी व युवकांना न्याय देणारा 'तारा' अर्थात तुळजाई शेती उत्पन्न वृद्धी प्रकल्प या एकत्रित शेतकरी उत्पन्न वृद्धी प्रकल्पा अंतर्गत गुंतवणूक करू इच्छिणाऱ्या उद्योजकांना आता EoI द्वारे प्रकल्पात सहभागी होण्याची संधी उपलब्ध केली जाणार आहे.

फळं, भाजीपाला व इतर शेतीमालावर प्रक्रिया करून मूल्यवृद्धी करणे, वेअरहाऊस, कोल्ड स्टोरेज ची सुविधा निमाण करणे, कृत्रिम किंवा वनस्पती-आधारित स्त्रोतांपासून व्हेगन लेदर ची निर्मिती करणे, Compressed Bio Gas ची निर्मिती करणे, तसेच MSME Park च्या माध्यमातून छोट्या उद्योजकांना देखील या प्रकल्पात गुंतवणूक करून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करणे अपेक्षित आहे.

तारा प्रकल्पाच्या प्रस्तावित माळूंब्रा, ता. तुळजापूर येथील १२०० एकर जागेचे अनेक बलस्थाने आहेत.

राष्ट्रीय महामार्गालगतचे स्थान, जागेतून जाणारी रेल्वेलाइन, २२० kV चे सबस्टेशन आणि पाण्याची मुबलकता पाहता उद्योजकांसाठी हा योग्य पर्याय ठरणार आहे.

मुख्यमंत्री तथा महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र)चे अध्यक्ष देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दि. २४.0४.२०२५ रोजीच्या बैठकीत तारा प्रकल्पास तत्वत: मान्यता देण्यात आलेली आहे.

यानुसार सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याची जबाबदारी कृषी आयुक्त, ग्रांट थॉर्टन इंटरनेशनल कंपनी आणि मित्र संस्थेतील तज्ज्ञांवर सोपविण्यात आली असून, MIDC देखील यात सहभागी असेल.

या प्रकल्पाच्या अनुषंगाने तुळजापूर येथे आयोजित आढावा बैठकीमध्ये मित्रचे उपाध्यक्ष आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी EoI बाबत सूचना दिल्या आहेत. सदर बैठकीस मित्र संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार तसेच सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## तालुक्यात हरित क्रांती : लाखो झाडांची होणार लागवड तालुका प्रशासन अग्रेसर



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१८ जुलै -**

राज्यात 'हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र' या अभियानांतर्गत १० कोटी वृक्ष लागवड मोहीम करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. वृक्षारोपण ही लोकचळवळ झाली तरच ही मोहीम यशस्वी होईल. त्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करावे, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी झालेल्या एका बैठकीत अधिकाऱ्यांना दिल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण आवश्यक आहे. देशात सर्वाधिक वनाच्छदन वाढविण्यात महाराष्ट्रात अग्रेसर आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील एक पेड माँ के नाम या अभियानात महाराष्ट्र चांगली कामगिरी करत आहे. त्या अनुषंगाने धाराशिव जिल्हा प्रशासनाकडून देखील वृक्ष लागवडीची जयंत तयारीत करण्यात आली आहे.

धाराशिव जिल्ह्यात 'हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र' या अभियानांतर्गत 'हरित धाराशिव अभियान' मोहीम हाती घेत यंदा प्रथमच १५ लक्ष पेक्षा अधिक वृक्ष लागवड केली जाणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वृक्ष लागवडीसाठी धाराशिव जिल्ह्यातील सर्वांचे अभिनंदन करत या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन नागरिकांना केले.

त्यानुसार वाशी तालुक्यात वृक्ष लागवड करण्याचा उपक्रम तालुका प्रशासनाकडून मोठ्या उत्साहात राबविण्यात येत आहे. सर्व ग्रामपंचायती, जिल्हा परिषद शाळा, सामाजिक संस्था या वृक्ष लागवडीच्या चळवळीत सहभागी झाल्या आहेत.

प्रशासनाकडून वेगवेगळ्या माध्यमातून गावागावात जनजागृती देखील करण्यात येत आहे. (दि.१८) जुलै रोजी तालुक्यातील तेरखेडा येथे तालुका प्रशासनाकडून वृक्ष लागवड जनजागृती रॅली काढण्यात आली होती. यामध्ये गावातील गणेश विद्यालय शाळा, सुबोध विद्यामंदिर शाळा, केंद्रीय प्राथमिक शाळा, जि.प कन्या शाळा, आदर्श विद्यामंदिर शाळेतील हजारो विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी सहभागी झाले होते.

रॅलीमध्ये ढोल, ताशा वाजत गाजत झाडे लावा झाडे जगवा, एक पेड माँ के नाम, वृक्ष लागवडी मोहिमेत सहभागी होवा अश्या घोषणा देत विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधले.

विशेष म्हणजे या हरित धाराशिव अभियान रॅलीत तालुक्याचे तहसीलदार प्रकाश मेहेत्रे, नायब तहसीलदार शिंदे, तालुका गटशिक्षणाधिकारी सोमनाथ घोलप, मुख्याध्यापक बाबुराव कोकाटे, अरूण बोंदर, तलाठी प्रवीण पालखे सह सर्व शाळांचे शिक्षक उपस्थित होते.

## पालकमंत्री प्रताप सरनाईक जिल्हा दौऱ्यावर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जुलै -**



परिवहन मंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक हे १९ व २० जुलै रोजी दोन दिवस जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे.

शनिवार १९ जुलै रोजी सोलापूर विमानतळ येथून सकाळी ११:१५ वाजता धाराशिवकडे प्रयाण.दुपारी १२;१५ वाजता धाराशिव तालुक्यातील शिंगोली येथील राखीव वन येथे हरित धाराशिव अभियानाच्या उद्घाटन समारंभास उपस्थिती.दुपारी २:१५ वाजता शिंगोली येथून शासकीय वाहनाने जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिवकडे प्रयाण.दुपारी २:२० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे आगमन व राखीव. दुपारी २:४५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथून शासकीय वाहनाने उमरगाकडे प्रयाण.दुपारी ४:४५ वाजता उमरगा येथे आगमन व उमरगा बसस्थानक नुतनीकरण कामाचे भूमिपूजन. सायंकाळी ५ वाजता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस भेट.सायंकाळी ५:१५ वाजता उमरगा येथून शासकीय वाहनाने मुरुम ता.उमरगाकडे प्रयाण. सायंकाळी ५:३५ वाजता मुरुम ता.उमरगा येथे आगमन व मुरुम बसस्थानक नुतनीकरण कामाचे भुमिपुजन. सायंकाळी ६:१५ वाजता महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेस सदिच्छा भेट.

सायंकाळी ६ : ३0 वाजता मुरुम ता.उमरगा येथून शासकीय वाहनाने शासकीय विश्रामगृह सोलापूरकडे प्रयाण व मुक्काम.

रविवार २0 जुलै २0२५ रोजी सकाळी ७ वाजता शासकीय विश्रामगृह येथून शासकीय वाहनाने तुळजापूरकडे प्रयाण.सकाळी ७:५0 वाजता श्री तुळजाभवानी मंदिर ता.तुळजापूर येथे आगमन व अभिषेक पूजा. सकाळी ९:४५ वाजता पोलीस अधिक्षक, धाराशिव व इतर पोलीस अधिकारी यांचे समवेत आढावा बैठक.सकाळी १0:४५ वाजता श्री तुळजाभवानी मंदिर ता.तुळजापूर येथून शासकीय वाहनाने नळदुर्गकडे प्रयाण. सकाळी ११:३0 वाजता नळदुर्ग येथे आगमन व नळदुर्ग किल्ला पाहणी. दुपारी १२: ३0 मिनीटांनी नळदुर्ग ता.तुळजापूर येथून शासकीय वाहनाने जेवळी ता.लोहाराकडे प्रयाण.दुपारी १ वाजता छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ आयोजित वृक्षारोपण सोहळ्यास उपस्थिती.जेवळी ता.लोहारा येथून शासकीय वाहनाने शासकीय विश्राम गृह सोलापूरकडे प्रयाण करतील.

## वैद्यकीय महाविद्यालय वेबिनार संपन्न

**धाराशिव, दि.१८ जुलै -**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांच्या वतीने Regulation of Gene Expression या विषयावर एक शैक्षणिक वेबिनारचे यशस्वी आयोजन करण्यात आले.या वेबिनारसाठी एम्स नागपूर येथील जीवरसायनशास्त्र विभागाचे प्रख्यात प्रा. डॉ.योगेश पावडे हे प्रमुख वक्ता म्हणून लाभले होते. डॉ.पावडे यांनी जीन अभिव्यक्तीच्या नियंत्रणाशी संबंधित मूलभूत संकल्पना, नियामक यंत्रणा आणि या प्रक्रियेचा जैववैद्यकीय संशोधनातील उपयोग या महत्त्वाच्या बाबींवर सखोल माहिती दिली. या कार्यक्रमास अधिष्ठाता डॉ.शैलेंद्र चौहान आणि उप-अधिष्ठाता डॉ.मुंडेवाडी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन डॉ. धाबे (विभागप्रमुख, जीवरसायनशास्त्र),डॉ.सिद्दीकी (सह. प्राध्यापक),डॉ.अंजुम सय्यद (सहाय्यक प्राध्यापक), आणि डॉ.चेतन राजपूत (सहा.प्राध्यापक, शरीरक्रियाशास्त्र) यांनी केले.

## परंडा शहरात नगरपरिषद ५१ हजार झाडे लावणार प्रशासनाकडून तयारी पूर्ण

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१८ जुलै -**

महाराष्ट्र शासन व जिल्हा प्रशासन यांच्या यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या हरित धाराशिव अभियान अंतर्गत एका दिवसात १५ लक्ष वृक्षारोपणाचा संकल्प करण्यात आला आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने कीर्ती किरण पुजार, जिल्हाधिकारी धाराशिव यांच्या मार्गदर्शनाखाली परंडा नगरपरिषदेने शहरात ५१ हजार झाडे लावण्याचा संकल्प केला असून दि.१९. जुलै २०२५ रोजी सकाळी ७.00 वाजता जामगाव रोड येथील हजरत खाजा बद्रोद्दिन दर्गा परिसरात घन वन पद्धतीने वृक्ष लागवड करण्यात येणार आहे.



या अभियानाच्या यशस्वीते करिता मुख्याधिकारी मनीषा वडेपल्ली यांच्या मार्गदर्शनाखाली नगर अभियंता राहुल रणदिवे, पंडीत कुलकर्णी, श्रीकृष्ण तांबवे, फिरोज शेख, जगदीश सोंडगे, संतोष साबदे या अधिकाऱ्यासह परंडा नगर परिषदेचे कर्मचारी विविध सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्थाचे पदाधिकारी यांनी या अभियानाची जोरदार तयारी सुरु केली.

शहरातील विविध सामाजिक संस्था, राजकीय पक्ष, शैक्षणिक संस्थाचे पदाधिकारी शहरातील प्रतिष्ठित नागरिक या उपक्रमात सहभागी होणार आहेत. या उपक्रमात सर्वांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन मुख्याधिकारी मनीषा वडेपल्ली यांनी केले आहे.

# जिल्हा रुग्णालयात जबड्याची किचकट शस्त्रक्रिया यशस्वी

### डॉ.कृष्णा उंद्रे-देशमुख यांच्या पथकाचे तीनतास अथक परिश्रम... रुग्णांकडून डॉक्टरांचे आभार...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ जुलै -**



धाराशिव जिल्हा रुग्णालयात आता हळूहळू बदल होत चालले आहेत. ऐरवी नेहमी सोलापूर, लातूर रेफर होणाजया रुग्णावर आता याठिकाणी चांगल्या शस्त्रक्रीया होत आहेत. धाराशिव तालुक्यातील कामेगाव येथील रुग्ण दुचाकीवरुन पडून गंभीर जखमी होवून जबडा व त्याखालील सर्व दात पुर्णत: निकामे झाले होते. अशा अवस्थेत हा रुग्ण जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल झाला होता. विशेष म्हणजे रक्त थांबण्यास तयार नव्हते, जबड्याची ही किचकट शस्त्रक्रिया करणे हे डॉक्टरांसाठी जिकरीचे काम होते. मात्र एमडीएस ओरल सर्जन डॉ. कृष्णा उंद्रे-देशमुख यांनी सदरील रुग्णावर यशस्वी शस्त्रक्रिया करत यश संपादन केले आहे. तब्बल तीनतास ही शस्त्रक्रीया चालली असून रुग्ण उपचार पुर्ण करुन तंदुरुस्त होवून आपल्या घरी सुखरुप पोहचला आहे. त्यामुळे रुग्णांसह रुग्णाच्या नातेवाईकांनी जिल्हा रुग्णालयातील डॉ.उंद्रे व त्यांच्या सर्व टिमचे आभार मानले आहेत.

धाराशिव तालुक्यातील कामेगाव येथील हनुमंत वेजिनाथ कदम (वय ४५) हे दुचाकीवरुन पडून त्यांच्या जबड्यास मोठा मार लागला होता. यामध्ये एक शिरही तुटली होती. खालच्या बाजुचे दात सर्व खिळाखिळा झाले होते. तसेच जबडाही आतील बाजूस सरकला होता. यामुळे रक्तस्त्राव जोरात सुरु होता. अशा अवस्थेत हे ६ जुले २०२५ रोजी जिल्हा रुग्णालयात दाखल झाले होते. अपघात घडल्यापासून दुपारी ४ ते रात्री ११ वाजेपर्यंत रक्तस्त्राव चालू राहिल्याने रुग्णांची प्रकृती विक झाली होती. त्यामुळे डॉक्टरांपुढे रुग्णांवर शस्त्रक्रीया करणे आव्हान होते.

मात्र शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठता डॉ. शैलेंद्र चौहान तसेच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. कृष्णा उंद्रे-देशमुख, असिस्टेंट डॉ. नागेश वाघमारे, भूलतज्ञ डॉ उज्मा आणि त्यांच्या टीमने ही शस्त्रक्रीया यशस्वी केली आहे. रविवारी ही घटना घडली होती. त्यामुळे डॉक्टर असतील का नाही, अशी शंका मागील काही अनुभवावरुन होती.

रविवार असतानाही माहिती कळताच डॉ.उंद्रे-देशमुख हे तात्काळ हजर राहिले. त्यांनी रुग्णावर तात्काळ उपचार सुरु केले. हादेखील जिल्हा रुग्णालयातील बदल झाल्याचे यावेळी दिसून आले. रुग्णांचा रक्तस्त्राव थांबत नव्हता, रात्री एक वाजता रक्तस्त्राव थांबवण्यात त्यांना यश मिळाले. त्यानंतर उपचार करत सोमवारी (दि.१४) रुग्णांवर शस्त्रक्रीया करण्यात आली. तब्बल तीनतास ही शस्त्रक्रीया चालली. आता रुग्ण पुर्वस्थितीत दिसत असून बुधवारी (दि.१६) रुग्ण हनुमंत कदम हे डिस्चार्ज घेवून घरी पोहचले आहेत.

धाराशिव येथील जिल्हा रुग्णालयात पुर्वीपेक्षा आता मोठ्या प्रमाणात बदल झाले आहेत, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामुळे त्यांचा चांगला फायदा होत असून रुग्णांना उपचार चांगले मिळत आहेत. अशा अनेक रुग्णांच्या प्रतिक्रीया ऐकावयास मिळत आहेत.

## मोफत आरोग्य शिबिराचा २३५ रुग्णांना लाभ

**तुळजापूर, दि.१८ जुलै -**

खासदार ओम प्रकाश राजे निंबाळकर यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेनाच्या (उद्धव ठाकरे गट) आरोग्य शिबिर घेण्यात आले. यामध्ये २३५ लोकांनी सहभाग नोंदवला. यावेळी काँग्रेस जिल्हाध्यक्ष धीरज पाटील, महिला आघाडी जिल्हाप्रमुख शामल वडणे, शिवसेना जिल्हा समन्वयक श्याम पवार,शिवसेना शहर प्रमुख राहुल खपले, शिवसेना शहर संघटक अर्जुन साळुंके, अमोल कुतवळ, नरेश पेंदे, उत्तम अमृतराव, रणजीत इंगळे, अनमोल साळुंके, आनंद जगताप, नवनाथ जगताप, विकास भोसले,राज खपले, शिवराज शेटे, क्रांती वाकळे, गोरक्षनाथ पवार, नागनाथ भाऊ भांजी, अजय साळुंके,बालाजी तट आदी मान्यवर उपस्थित होते. शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ.जाधव, डॉ. नीतू मलबा, डॉ. जगदाळे, डी. एस, डॉ .के बी गुंड, डॉ. कामठाणे डी एम, डॉ. वारुळे, डॉ. गारगिलवार अंकिता, ञी. माने, ञी. तांबोळी वसीम यांनी सहकार्य केले.

# सोनपेठ तालुक्यात सरपंच पदासाठी नव्याने आरक्षण जाहीर

## - ४२ ग्रामपंचायतींसाठी प्रवर्गनिहाय आरक्षण जाहीर



**बाबासाहेब गर्जे**

**सोनपेठ ,/प्रतिनिधी-** तालुक्यातील ग्रामपंचायत ४२ ग्रामपंचायत सरपंच पदासाठी आरक्षण सोडत संदर्भात आज सोमवार दि.१४ जुलै रोजी सकाळी ११ .वाजता तहसील कार्यालय सोनपेठ सभागृहा तहसीलदार सुनिल कावरखे यांच्या अध्यक्षतेखाली सभा संपन्न झाली आहे.

सोनपेठ तालुक्यातील ग्रामपंचायतींतील सरपंच, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तालुक्यातील ४२ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासाठी यापुर्वीच आरक्षण सोडत झाली होती मात्र न्यायालयाच्या आदेशानंतर जिल्हाधिकारी यांनी सुधारित आरक्षण सोडत घेण्यासाठी आदेशित केले होते त्यानुसार सोमवारी सकाळी तहसील कार्यालय सोनपेठ सभागृहामध्ये सरपंच पदासाठी आरक्षण सोडत नव्याने काढण्यात आले .यावेळी तालुक्यातील सहा ग्रामपंचायत मध्ये यापूर्वी सुटलेल्या आरक्षणामध्ये बदल झाला असून अनुसूचित जातीसाठी आरक्षित आरक्षणामध्ये कोणताही बदल झालेला नाही .

दरम्यान ही आरक्षण सोडत पारदर्शक पद्धतीने आणि शांततेत पार पडली. तहसील कार्यालयाच्या अधिकाऱ्यांसह ग्रामसेवक, स्थानिक प्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्याने सुधारित आरक्षण सोडतीमध्ये काय बदल होतात याकडे सर्वांचे लक्ष लागले होते यामध्ये अनुसूचित जातीसाठी आरक्षित सरपंच पदे: ६ (त्यापैकी महिला: ३) अनुसूचित जमातीसाठी आरक्षण: ० ना .मा .प्रवर्गासाठी आरक्षित पदे: ११(त्यापैकी महिला: ५) खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित पदे: २५ (त्यापैकी महिला: १२) अनुसूचित जाती प्रवर्गासाठी आरक्षित ग्रामपंचायती: सर्वसाधारण अ.जा.: लोहीग्राम ,निमगाव,बुक्तवाडी अ.जा. महिला: कोठाळा ,देविनगर ,पारधवाडी नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षित ग्रामपंचायती: पुरुष : नैकोटा,मोहळा शेळगाव ,उक्कडगाव( म.)विटा (खु)कोरटेक महिला: शिर्शि (बु),आवलगाव ,बोंदरगाव ,खडका,लासीना खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित ग्रामपंचायती: सर्वसाधारण: भिसेगाव, डिघोळ (ई)दुधगाव ,गंगापिंपरी,कान्हे गाव,नरवाडी,पोहंडुळ,शिरोरी, ,तिवठाणा,वाडीपिंपळगाव ,वंदन,निळा ,वाणीसंगम महिला : चुकारपिंपरी, धामोणी. धारडिघोळ ,गवळीपिंपरी ,करम ,खपाटपिंपरी,सायखेडा थडी उक्कपडगाव,वडगाव,वैतागवाडी थडीपिंपळगाव ,उखळी (बु. ) सुधारीत आरक्षण सोडतीत बदल झालेल्या ग्रामपंचायतींची माहिती. उखळी बु. ग्रा.पं. नागरीकांचा मागास प्रवर्ग ऐवजी सर्वसाधारण महीला, भिसेगाव ग्रा.पं. सर्वसाधारण महीला ऐवजी सर्वसाधारण कोरटेक ग्रा.पं. सर्वसाधारण महीला ऐवजा ना .मागास प्रवर्ग, सरपंच पदासाठी आरक्षण सोडतीत सुटले आहे

## संक्षिप्त वृत्त...

### संभाजी बिग्रेडचे प्रदेशाध्यक्ष गायकवाड यांच्यावर भ्याड हल्लाचा तीव्र निषेध

**जिंतूर,/प्रतिनिधी :** अक्कलकोट येथे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष व सामाजिक चळवळीचे प्रखर नेते प्रवीणदादा गायकवाड यांच्यावर नुकताच झालेला भ्याड व घृणास्पद हल्ला म्हणजे केवळ एका व्यक्तीवर नव्हे, तर पुरोगामी विचारसरणी, सामाजिक न्याय आणि लोकशाही मूल्यांवर झालेला आघात आहे, असे संतप्त प्रतिपादन संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी आपल्या निवेदनाद्वारे केले आहे.
या हल्ल्याच्या निषेधार्थ तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांना संभाजी ब्रिगेडच्यावतीने निवेदन सादर करण्यात आले.
मुख्यमंत्री व गृहमंत्री यांच्यादृष्टीनं हा हल्ला गंभीर असून, या प्रकरणात संबंधित संघटनेचे प्रमुख व हल्ल्यात सहभागी असलेल्या कार्यकर्त्यांवर मोक्का अंतर्गत कठोर गुन्हे दाखल करून तत्काळ अटक करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.
निवेदनात पुढे म्हटले आहे की, प्रवीणदादा गायकवाड हे गेल्या अनेक वर्षांपासून मराठा समाजासाठी, सामाजिक समतेसाठी आणि पुरोगामी विचारसरणीच्या प्रसारासाठी अविरत झटत आहेत. अशा नेतृत्वावर झालेला हल्ला म्हणजे समाजहितासाठी लढणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उभे करणारा प्रकार आहे.
सुरक्षेची मागणी आणि इशारा
हल्लेखोरांवर कठोर कारवाई न झाल्यास, आणि प्रवीणदादा यांची सुरक्षा न सुनिश्चित केल्यास, संभाजी ब्रिगेड कायदा हातात घेण्यास भाग पडेल असा इशारा देखील निवेदनातून देण्यात आला आहे.
अशा परिस्थितीत कायदा व सुव्यवस्थेचा भंग झाल्यास संपूर्ण जबाबदारी शासनाची राहील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.
या निवेदनाच्या प्रती मा. मुख्यमंत्री, गृहमंत्री यांच्यासह तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्री तथा ग्राहमंत्री यांना देण्यात आल्या असून,शासनाने तात्काळ ठोस पावले उचलावीत, अशी मागणी संपूर्ण राज्यभरातून होत आहे.या निवेदनावर माजी सैनिक बालाजी शिंदे,शरद ठोंबरे, अँड माधव दाभाडे,संतोष शिंदे, सुनील गाडेकर, पिंटू रोकडे, विलास रोकडे,दामू नवले,बापू भांबळे,अभीजीत देशमुख, सोपान धापसे,धनंजय जाधव, लक्ष्मण कवडे,अनिल गाडेकर,पिंटू डोंबे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत..

### ग्रामीण रुग्णालयात १३ महिलांवर कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** येथील ग्रामीण रुग्णालयात सोमवारी प्रथमच १३ महिलांवर बिन टाका कुटूंब कल्याण शस्त्रक्रियेचा कार्यक्रम पार पडला.यावेळी नांदेड येथील डॉ.बोले यांनी सदरील महिलांवर शस्त्रक्रिया केल्या.
महिलांसाठी केल्या जाणाऱ्या कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया मागील अनेक दिवसांपासून सोनपेठ येथे बंद होत्या.यावेळी परभणी जिल्हा शैल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली या शस्त्रक्रिया कँप चे आयोजन सोमवार दि.१४ जुलै रोजी करण्यात आले होते. दरम्यान सोनपेठ शहर, तालुका व परिसरातील एकूण १३ महिलांवर कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यात आल्या.यासाठी सोनपेठ ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विठ्ठल कराड, रुग्णालयाचे आमदार नियुक्त सदस्य बळीराम काटे वैद्यकीय अधिकारी डॉ.सिद्धेश्वर हालगे, डॉ.भारत चव्हाण, डॉ.बिभिषण जाधव व रुग्णालयातील सर्व कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

### सेलूत ग्रामपंचायत आरक्षण सोडत जाहीर



**सेलू,/प्रतिनिधी:** ग्रामपंचायत आरक्षण सोडत जाहीर झाली असून नूकत्याच ग्रामीण गाव पूढा-याच्या स्थानिक स्वराज्यसंस्था निवडणूकीकडे लक्ष लागलेले असतांना देखील ग्रामपंचायत आरक्षण सोडतीसाठी गाव पूढा-यांचा उत्साह दिसून येत नव्हता.
.नियोजीत वेळेपेक्षा आर्धा तास उशिराने सोडतीला सूरूवात केली तरी प्रती वर्षाप्रमाणे मतदारांची उपस्थिती दिसून आली नाही. येथील तहसिल कार्यालयाच्या सभागृहात सोमवार १४ जूलै रोजी एकूण ८२ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत जाहिर करण्यात आली यातील ४१ ग्रामपंचायतचा कारभार यापूढे महिलांच्या हाती येणार असल्याचे निश्चित केले.यावेळी उपविभागीय अधिकारी संगिता सानप,तहसिलदार डाँ. शिवाजी मगर,नायब तहसिलदार गजानन इनामदार,हरिष टाक ,गोविंद राठोड,अमोल खेडकर,विजय टेकाळे,रवी बंदूके,सूजीत इंगोले आदी सह निवडणूक विभागातील कर्मचारी उपस्थित होते.
सर्वसाधारण महिला: गूगळी धामणगाव, सेलवाडी,खादगाव, मोरेगाव,गोमेवाकडी,निरवाडी(बू),सोन्ना,धनेगाव,मालेटाकळी, वालूर,साळेगाव,सिद्धनाथ बोरगाव,सोनवटी,करडगाव,निरवाडी खू,झोडगाव,रायपूर बोरकीनी/नरसापूर,खूपसा,करजखेडा,डिग्रस खू/ डिग्रस बू,हातनूर,चिकलठाणा खू,डासाळा,आहेर बोरगाव, नागरीकांचा मागास प्रवर्ग महिला: लाड नांदरा पिंपरी बू गौंडगे /शिंगठाळा,राजवाडी,गोहेगाव,पिंपरी(बू),गव्हा,नागठाणा/कूंभारी,खेर्डा दू.की.,म्हाळसापूर,कूपटा,कवडधन,
अनूसुचित जाती महिला:भांगापूर, ब्राम्हणगाव प्र.को./डूगरा,डिग्रस जहांगीर,शिंदे टाकळी,तांदूळवाडी, सर्वसाधारण कान्हड,गिरगाव बू,चिकलठाणा बू,तिडी पिंपळगाव,बोरगाव जहांगीर/वलंगवाडी ,वाकी,वाई/बोथ,खैरी,गिरगाव(खू),निपाणी टाकळी,पिंपळगाव गोसावी,हट्टा,काजळी रोहिणा,कूडा/कोलदंडी,केमापूर,नांदगाव,पिंप्रूळा, जवळा जिवाजी,ब्राम्हणगाव प्रप्र,राधे धामणगाव,हिस्सी,ढेंगळी पिंपळगाव,पिंपरी खू,सिमनगाव, नागरीकांचा मागासप्रवर्ग सर्वसाधारण: कूंडी,तळतूंबा,राजा,रवळगाव,आडगाव दराडे,खवने पिंपरी,ब्रम्हवाकडी,सावंगी (पि.सी.),पारडी कौसडी/मापा,कन्हेरवाडी,राजूरा,अनुसुचित जाती प्रवर्ग सर्वसाधारण:
हादगाव खू,राव्हा,सिराळा,देवगाव,देऊळगाव गात
अनूसूचित जमाती प्रवर्ग सर्वसाधारण: गूळखंड आदी प्रमाणे एकूण ८२ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासाठीची आरक्षण सोडत निश्चित झाली आहे.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

## सोनपेठ पोलीस ठाण्यात वृक्षारोपण



**सोनपेठ,/प्रतिनिधी:** येथील पोलीस ठाण्याचे वतीने १४ जुलै रोजी पोलीस स्टेशन मोकळ्या जागेवर वृक्षारोपण करण्यात आले, या वृक्षारोपनासाठी पोलिस ठाण्यातील सर्व कर्मचाऱ्यांनी व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी श्रमदान करून केशर आंब्याच्या झाडांचे वृक्षारोपण केले.
या झाडांच्या संवर्धनासाठी व संगोपनासाठी लोखंडी जाळ्यांचे संरक्षण कुंपण लावण्यात आले आहे.
वृक्षलागवड या कार्यक्रम प्रसंगी सपोनी. विनोद चव्हाण यांनी बोलताना सांगितले की, वृक्ष लावणे सोपे आहे, त्यामुळे वृक्षारोपण झाल्यानंतर त्यांचे संगोपन करण्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. त्यामुळे या वृक्ष संगोपनाचे काम एक जबाबदारी म्हणून आपण सर्वजण घेणार असून पुढील काळात वेळोवेळी त्याचा आढावाही घेणार आहोत असे सर्व उपस्थित त्यांना सांगितले.
याप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक अजय कीरकन, पोलीस सपोउपनि विनोद कुलकर्णी, पोलीस हवालदार मनोज राठोड, भगवान पवार, हनुमान गुट्टे, शिवाजी शिंदे, श्रीकृष्ण तिडके, दिपक कदम, शिक्षक, पोलीस पाटील शेषराव चव्हाण, प्रा डॉ बापूराव आंधळे, प्रा डॉ संतोष रणखांब, प्रा अर्जुन मोरे उपस्थित होते. दरम्यान कै रमेश वरपूडकर महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी कु. सायली पतंगे, कु. दीक्षा चव्हाण, कु. पुनम हुक्के, हर्षवर्धन वाघमारे, चंद्रशेखर वाघमारे, निखील वाघमारे, अजय वाघमारे, प्रथमेश वाघे, किर्तेश्वर दळवे, ओमकार मोरे, नरसिंग खोडवे, करण रंजवे, इत्यादींनी वृक्षलागवड साठी श्रमदान केले.



### वादळी वारा व पावसामुळे सौर कृषि पंपाचे नुकसान

**परभणी,/प्रतिनिधी-** तालुक्यातील मंगळवारी सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास देवसडी परीसरात वारे व पाऊस पडल्यामुळे भागोजी काळे या शेतकऱ्याचे कृषी पंपाचे नुकसान झाले गेल्या काही दिवसापासून पावसाने विश्रांती घेतली होती परंतु काय सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास देवसडी वरामेश्वर परिसरात अवकाळी पावसासह वारे सुटल्यामुळे भागोजी काळे राहणार देवसाडी गट क्रमांक ४८ या शेतातील शेतकऱ्याचे शेतामध्ये सौर कृषी पंप बसविले होते त्या पंपाचे प्लेट पावसामुळे नुकसान झाले नुकसान झालेल्या प्लेटची शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाल्यामुळे शासनाने नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी शेतकरी भागोजी काळे यांनी केली आहे

## शहराच्या उलट्या नदीचे होणार संवर्धन पालकमंत्री मेघना बोर्डीकरांची माहिती



**जिंतूर,/प्रतिनिधी :** जिंतूरपालकमंत्री मेघना बोर्डीकरांच्या संकल्पनेतुन शहरातून वाहणाऱ्या उलट्या नदीचे लवकर संवर्धन केले जाणार होणार आहे.
या निर्णयामुळे उलट्या नदीला नक्कीच अच्छे दिन येणार असल्याचे शहरवाशियात समाधान व्यक्त होत आहे.
याविषयी सविस्तर माहिती अशी की जिंतूर शहर हद्दीतून उलटी नदी शहरातील विविध भागातील सांडपाणी या नदीत सोडले जात असल्याने सहाजिकच पाण्याचे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते. हे प्रदूषण रोखण्यासाठी व नदीकाठील धूप थांबवण्या संदर्भात या उलट्या नदीचे संवर्धन करणे काळाची गरज निर्माण झालेली आहे.
महत्त्वाचे म्हणजे पुढे हीच उलटी नदी बोरी,चांदज जवळील करपरा नदीस मिळते. नदी काठ विकसित करण्या संदर्भात नगर परिषदेचे मुख्याधिकारी नेमिनाथ दंडवते यांना नदी संवर्धन योजनेअंतर्गत शासनास प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही दिल्याची माहिती पालकमंत्री मेघना बोर्डीकरांनी स्पष्ट केले आहे.या अंतर्गत पुढील कार्यवाही करण्या बाबत प्रस्तावित केले आहे.शहरातील घाट विकसित करणे,नदी काठची धूप रोखणे व नदी संवर्धनासाठी आवश्यक त्या उपाययोजना कार्यान्वित करणे.या अनुषंगाने शासन निर्णय १ मार्च २०१४ च्या मार्गदर्शक तत्वानुसार या सह सुसाध्यता अहवालानुसार सविस्तर प्रकल्प अहवाल या क्षेत्रातील मान्यताप्राप्त तंत्र तांत्रिक संस्थे मार्फत किंवा सल्लागाराच्या मदतीने तयार करण्यात येणार आहे.योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार सुसाधता अहवाल तयार करून तो शासनास तत्त्वता मान्यतेसाठी पाठविल्या नंतर अहवालाच्या तांत्रिक छाननी अंती सचिव स्तरिय समिती द्वारे योजनेत समाविष्ट करायची आहे.व उपयोगात आणल्याचे तंत्रज्ञान याची निश्चिती झाल्या नंतर संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था मान्य कामाचा सविस्तर अहवाल नदी कृती योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वा प्रमाणे तयार करेल किंवा योजने अंतर्गत स्थापित तांत्रिक कक्षा कडून तयार करून येईल सविस्तर प्रकल्प अहवालाचे प्राधिकरण संस्थेचे तांत्रिक मूल्याकन करून त्या प्रमाण पत्रासह अहवाल शासनास अंतिम मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.वरील प्रमाणे शहरातील उलट्या नदीच्या संवर्धनासाठी सुसाध्यता अहवाल व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्या करिता तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती जिंतूर नगर परिषदे तर्फे करण्यात आली आहे. पुढे शासनाकडे निधी अहवाल प्रस्ताव पाठवून मंजूर निधीतून उलट्या नदीचा कायापालट करण्यात येणार आहे.

## सवलतीच्या नादात एसटीचा झाला खुळखुळा ; बिघाड बसेस रस्त्यावरच उभ्या!



**सोनपेठ ,/प्रतिनिधी-** एकेकाळी सुरक्षित प्रवासाची हमी म्हणजे राज्य महामंडळाची एसटी प्रवासी बस असे समजले जायचे परंतु आता हीच एसटी बस असुरक्षित प्रवासाची साधन बनली आहे कारण राज्य परिवहन महामंडळाच्या विविध सवलतीच्या नादामध्ये एसटीचा पार खुळखुळा झाला आहे. त्यामुळे कधी चालता चालता टायर फुटणे, पाटा तुटणे, पंक्चर होणे, पावसात गळणे यासह अनेक संकटे पेलत आजची एसटी रस्त्यावर धावत असते. बिघाड होऊन सोनपेठ तालुक्यातील कुठल्याही रस्त्याच्या कडेवर दररोजच थांबलेल्या या बस पाहणे आता यात नवल वाटत नाही. कारण डबघाईला आलेल्या एसटी बसचा हा प्रकार नित्याचाच झाला आहे.

आर्थिक डबघाईला आलेल्या एसटी महामंडळाचा आर्थिक गाडा कोरोनाच्या साथीमुळे आणखीनच गाळात रुतला. त्यातच एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा सहा महिने लांबलेला संप यामुळे एसटी महामंडळ पुन्हा अधिकच डबघाईला आले होते. त्यानंतर एसटी महामंडळाची अवस्था दिवसेंदिवस बिकट झाली. मे २०२२ पासून एसटीची विसावलेली वाहतूक सेवा पुन्हा सुरू झाली. एसटीपासून दुरावलेला प्रवासी पुन्हा एसटीकडे वळविणे हे मोठे आव्हान होते. यावेळी राज्य सरकारने ७५ वर्षावरील ज्येष्ठांना सर्व प्रकारच्या बसमधून मोफत प्रवासाची सुविधा देणारी अमृत ज्येष्ठ नागरिक प्रवासी योजना सुरु केली. त्यामुळे प्रवाशांची संख्या वाढली. एसटी महामंडळाने त्यानंतर महिला प्रवाशांसाठी ५० टक्के सवलत योजना सुरू केली. ज्यामुळे एसटीच्या प्रवासी संख्येत मोठी वाढ झाली. एसटी महामंडळ जपळपास ६३ समाज घटकांना प्रवासात सवलत देते. सध्या सरासरी ५४ लाख प्रवासी एसटीतून दररोज प्रवास करीत आहेत. या सवलत योजनांची प्रतिपूर्ती राज्य सरकार करीत असल्याने एसटीचा फायदा झाल्याचे म्हटले जाते. परंतु ही एसटी नफ्यात की तोट्यात? हे मात्र न उलगडणारे कोडेच म्हणावे लागेल. कारण मागील अनेक दिवसांपासून महामंडळाच्या खुळखुळा झालेल्या बस रस्त्यावरून धावताना दिसत आहेत. त्यामध्ये पाऊस असेल तर बस चक्क गळू लागतात अनेक बसचे टायर गोटा झाले आहेत ते नेहमीच फुटतात, पंक्चर होतात. सर्व पत्रे ढीले झाल्याने पत्र्यांचा खडखडाट व पाट्यांचा खळखळाट, सायलेन्सर मधून निघणारा काळाभोर धूर, फुटलेल्या काचा आणि तुटलेल्या शीट अशा प्रकाराने एसटीची पार इज्जत घालवली आहे. एसटी जर नफ्यात असती तर मग त्याची दुरुस्ती का होत नाही? तसेच मुबलक प्रमाणात नवीन बसची खरेदी का होत नाही? आज सर्वाधिक धोक्याची पातळी महामंडळाच्या बसने ओलांडली आहे. कारण चालू बस मध्ये अनेक वेळा बिघाड झाल्याने नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. त्यामुळे एसटीचा सुरक्षित प्रवास हा केवळ नावाला राहिला असल्याचे प्रवाशी वर्गातून बोलले जात आहे. अनेकदा तिकीटे काढून प्रवास करणारे नागरीक बस मध्ये उभे असतात आणि फुकटच्या सवलतीत प्रवास करणारे शिट पकडून आरामात असतात.त्यामुळे याचा अनेकांना त्रास होतो व ते खाजगी प्रवाशी वाहनांना पसंदी देतात.मोफत प्रवास सवलतींचा फायदा घेण्यासाठी तर अनेकांनी चक्क वयामध्ये खाडाखोड करून घेत नवीन आधारकार्ड बनवले आहेत.याचा फायदा घेण्यासाठी अनेकजण किरकोळ कामानिमित्त बस प्रवासाचा आनंद घेत आहेत.सरकार मतांसाठी खरंच षंड झाले आहे का? हा एक संशोधनाचा विषय बनला आहे. परंतू ते काही असो, सरकारच्या मोफत सवलतीच्या नादात लालपरीचा पार खुळखुळा झाला आहे! एकेकाळी सर्वांना हवीहवीशी वाटणारी प्रवासी बस आता नकोशी झाली आहे.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष गरजू रुग्णांसाठी ठरतोय वरदान

# मागील सहा महिन्यात ३ कोटीचे रुपयांचे अर्थसहाय्य वितरीत

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१८ जुलै -**

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष पात्र व गरजु रुग्णांसाठी वरदान ठरत आहे. १ जानेवारी ते ३० जून २०२५ या कालावधीत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातून नांदेड जिल्ह्यात ३८५ रुग्णांना ३ कोटी ३१ लाखांची मदत देण्यात आली. दिवसेंदिवस मदतीमध्ये वाढ होत आहे. गरजू रुग्णांना वेळेत मदत मिळावी, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनातून जिल्हा स्तरावर कक्ष उपलब्ध झाल्याने रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे असे रामेश्वर नाईक, कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांनी सांगितले.

राज्यातील नागरिकांना दुर्धर आजारांवरील उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडून आर्थिक सहाय्य देण्यात येते. तसेच आपत्ती प्रसंगीही आर्थिक मदत देण्यात येते. यासाठी राज्यातील कानाकोपऱ्यातून मदत मिळविण्यासाठी नागरिक मंत्रालयात जात असत. परंतु नागरिकांना या सेवा सहजपणे त्यांच्या जिल्ह्याच्या ठिकाणी उपलबध व्हाव्यात, म्हणून आता प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी या कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. सध्या नांदेड येथे हा कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील प्रशिक्षण भवनच्या इमारतीत कार्यरत आहे.



वैद्यकीय उपचाराकरिता मदत मिळण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाशी संलग्नीत नांदेड जिल्ह्यातील खालील रुग्णालयांचा समावेश आहे. या निधीच्या मदतीतून रुग्ण या रुग्णालयात उपचार करुन घेतात. २१वीं सेन्चुरी हॉस्पिटल नांदेड, अभ्युदय लाईफ केअर सुपर स्पेशालिटी इनस्टीटयुट प्रा. ली. नांदेड, आनंद कॅंसर आणि मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल नांदेड, अंकुर मॅक्स क्रीटीकल केअर नांदेड, अपेक्षा क्रिटीकल केअर सेंटर आणि मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल प्रा. ली. नांदेड, अश्विनी क्रिटीकल आणि हार्डकेअर सेंटर प्रा. ली. नांदेड, अथर्व सर्जिकल हॉस्पिटल, नांदेड, भगवती मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल नांदेड, गोदावरी इनस्टुटयुट ऑफ क्रिटीकल केअर मेडीसीन नांदेड, गर्व्हमेंट मेडीकल कॉलेज आणि हॉस्पिटल नांदेड, गुरुकृपा सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल डॉक्टर लेन नांदेड, लव्हेकर हॉस्पीटल नांदेड, लोटस हॉस्पिटल नांदेड, मोनार्क कॅंसर हॉस्पिटल नांदेड, मुंडे हॉस्पिटल देगलूर, जि. नांदेड, नांदेड क्रिटीकल केअर हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर नांदेड, नारायणा इनस्टुटयुट ऑफ मेडीकल सुपर स्पेशालिटी नांदेड, निर्मल न्युरो केअर ण्ड सुपर स्पेशालीटी सेंटर नांदेड, रेंगे हॉस्पिटल नांदेड, साई हॉस्पिटल सर्जीकल ण्ड क्सीडेंट नांदेड, संजीवन हॉस्पिटल नांदेड, श्री गंगा हॉस्पिटल नांदेड, श्रीनिवास ऑथोपेडीक नर्सिंग होम नांदेड, एसएसपी केअर ड्व्हॉस पॅट्रीओट्रीक सेंटर प्रा. ली. नांदेड, सनराईज ग्लोबल सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल नांदेड, विश्वा इनस्टुटयुट न्युरोलॉजी ण्ड किडनी सेंटर प्रा. ली. नांदेड, विश्व प्रयाग हॉस्पिटल नांदेड, यशश्री मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल नांदेड, यशोसाई क्रिटीकल केअर कौठा, नांदेड, यशोसाई हॉस्पिटल नांदेड, यशोसाई ऑर्थोपेडिक हॉस्पिटल कौठा, नांदेड या रुग्णालयाचा समावेश आहे. तरी गरजू व पात्र रुग्णांनी या उपक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# गाढव हा धर्माशी निगडीत व गोंडस नसल्याने दुर्लक्षित: मेघना कावली

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि.१८ जुलै -**

पशूंमधील आजार ओळखून उपचार करावे लागतात, हे अवघड काम आहे. इतर प्राण्यांपेक्षा गाढवांना अधिक कष्ट असून देखील हाल सहन करावे लागतात. कदाचित गाढव कुठल्याही धर्माशी निगडीत अथवा देखणा नसल्याने दुर्लक्षित असावा असे जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी मेघना कावली म्हणाल्या. मंगळवार (दि.१५) रोजी सगरोळी (ता. बिलोली) येथे धर्मा डाँकी सँच्यूअरी या संस्थेने नांदेड जिल्ह्यातील पशुधन विकास अधिकाऱ्यांसाठी फेडरेशन ऑफ इंडिअन अनिमल प्रोटेक्शन ऑर्गनायझेशन्स, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने कार्यरत अश्ववर्गीय प्राण्यांमधील आरोग्य समस्या व त्यांचे व्यवस्थापन: व्यावहारिक मार्गदर्शन. प्रशिक्षण कार्याक्रमाचे आयोजन केले होते.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष प्रमोद देशमुख,विश्वस्त संजीव सगरोळीकर,माफसूचे सेवा निवृत्त,संशोधन संचालक डॉ. अनिल भिकाने,पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे प्रादेशिक सहआयुक्त डॉ. नाना सोनावणे,जिल्हा उपायुक्त डॉ.राजकुमार पडिले, निवृत्त जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. भूपेंद्र बोधनकर,डॉ. दिनेश मोहिते,शिक्षणाधिकारी माधव सलगर आदींची उपस्थिती होती.

संस्थेचे विश्वस्त सगरोळीकर यांनी, संस्थेची सुरुवात व उद्देश स्पष्ट केला. डॉ. पडिले यांनी जिल्ह्यात रेती वाहतुकीसाठी गाढवांचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असल्याने संस्थेचे कार्य अत्यंत गरजेचे असल्याचे सांगितले. डॉ. सोनावणे यांनी माळेगाव यात्रेत गाढवांसाठी विशेष सुविधा सुरू करण्याचे आश्वासन दिले व संस्थेस शासनाच्या योजनांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. डॉ. दिनेश मोहिते व डॉ. निहाल मुल्ला यांनी गाढवांच्या आजार व उपचार याबाबत प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ. प्रवीणकुमार घुले यांनी केले.

**निवृत्तीबद्दल डॉ. अनिल भिकाने व डो.भूपेंद्र बोधनकर यांचा सत्कार**

डॉ. भिकाने यांनी, सत्कारास उत्तर देताना, माझा सत्कार व प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील १०० पशुवैद्यकांची उपस्थिती हा दुग्ध शर्करा योग आहे. पशु आधारित व्यवसाय हा देशाच्या अर्थ व्यवस्थेचा कणा आहे. दूध, अंडी, मांस उत्पादनाचा मोठा वेग असून, यामध्ये पशुसंवर्धन विभागाचे मोठे योगदान आहे. मुक्या जनावरांसाठी कार्यरत राहावं कारण पशुवैद्यकांना शेतकरी दैवत मानतात असे म्हणाले.

## संक्षिप्त वृत्त



### सिडकोत लोकशाहिर डॉ. अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**नवीन नांदेड,-** लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या स्मृति दिनानिमित्त सिडको येथील अण्णाभाऊ साठे सभागृहातील अर्धकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून दिनांक १८ जुलै रोजी सकाळी दहा वाजता समाज बांधवांच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले. प्रभावी लेखणीतून व अनमोल वाणीतून वंचितांच्या व्यथा मांडणारे लोकशाही, लेखक, समाज सुधारक डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त सिडको येथील अण्णाभाऊ साठे सभागृहातील त्यांच्या अर्धाकृती पुतळ्यास तमाम सिडको करांच्या व समाज बांधवांच्या वतीने पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी सिडकोतील बेबीताई गोपीले,जनार्धन गोपीले, गंगाधर वाघमारे, उत्तम घोडसकर, आर. जे. वाघमारे, नारायण कोलंबीकर, पी.एस. गवळे,आनंदा गायकवाड, बसवंते सर,माधव आंबटवार,डि.के.कांबळे ,प्रदिप हनवते ,शंकर धिरडीकर, बा.रा. वाघमारे,शाहीर गौतम पवार, जयंती मंडळाचे अध्यक्ष नितीन वाघमारे, पप्पू गायकवाड, एकनाथ वाघमारे, सुरेश कांबळे, विलास दादा गजभारे, राजू लांडगे, प्रसेनजीत वाघमारे, विठ्ठल घाटे, विशाल गडंबे, केशव कांबळे, राहुल वाघमारे, अंबादास मेकाले, पत्रकार डीगा पाटील, सुरेश आंबटवाड, व्हॉईस ऑफ मीडिया नांदेड दक्षिणचे अध्यक्ष संभाजी सोनकांबळे,सुजित निळकंठे, गोकुळ वाघमारे, कोकरे मामा यांच्यासह समाज बांधवांची उपस्थिती होती.

### राज्यभरातील परिचारिका आक्रमक; काम बंदचा इशारा



**मुदखेड -** महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना मुख्यालय लातूर संलग्न शाखा नांदेड, महाराष्ट्र राज्य सार्वजनिक आरोग्य सेवा परिचारिका संघटनेच्या वतीने दि. १७ जुलै रोजी मुदखेड ग्रामिण रुग्णालय येथील परिचारिकांनी राज्यव्यापी संप केला. राज्यातील सरकारी आणि निमसरकारी वैद्यकीय संस्थांमध्ये कार्यरत परिचारिकांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे सरकारने वारंवार दुर्लक्ष केल्याने अखेर महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना आक्रमक झाली आहे. संघटनेने १५ आणि १६ जुलै २०२५ रोजी मुंबई येथील आझाद मैदानावर धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला होता. मागण्या मान्य न झाल्यास १८ जुलै ते २५ जुलैपासून राज्यव्यापी बेमुदत काम बंद आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. परिचारिका संघटनेच्या निवेदनात म्हटले आहे की, शासनाने यापूर्वी घेतलेल्या बैठकीत अनेक मागण्यांवर सकारात्मक भूमिका दर्शवली होती. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीत कोणतीही ठोस पावले उचललेली नाहीत. त्यामुळे वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांपासून ते शिक्षक, पर्यवेक्षक आणि पठनप्रशिक्षिका पदावरील कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, राज्यभरातील परिचारिकांना न्याय मिळावा यासाठी संघटनेनी शांततेच्या मार्गाने शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला. मात्र मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्याने आंदोलनाशिवाय आता पर्याय उरलेला नाही.

## विजेचा शॉक लागुन बैलाचा मृत्यू

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि.१८ जुलै -**

विद्युत महावितरण विभागाच्या हलगर्जीपणामुळे खांब्याच्या तनाव्यात विज उतरल्याने शेतात कोळपणी करणाऱ्या शेतकऱ्याचा बैल अंदाजे किंमत ५० हजार रुपये विजेचा शॉक लागून जागीच मृत्यृ झाला. कोळपणी करणारेपाच जणांनी वेळीच बाजूला गेल्यामुळे वाचले.

दिनांक १६ रोजी दुपारी कोसमेट येथील शेतकरी बालाजी शेषेराव वाघमारे यांनी एका बैल जोडीवर पाच कोळपे धरून शेतात कोळपणी चालू होती कोळपे धरणारे संदीप मॅकलवाड, नरसिम्हा जामगेवाड, दिगांबर मॅकलवाड, सुदाम अक्कमवाड हे शेतात कोळपणी करत असताना शेतातील विद्युत खांबाच्या तणाव्याजवळून कोळपे जात असताना तणाव्यात विद्युत वीज उतरल्याने बैलाला विजेचा शॉक लागून जागीच मृत्यू झाला. सदरील घटनेचे गांभीर्य ओळखून पाच जणांनी बाजूला गेल्यामुळे मोठा अनर्थ टळला तात्काळ महावितरण कंपनीला फोन केल्यामुळे सदरील विद्युत पुरवठा बंद करण्यात आला .

# मुदखेड न.पा.निवडणूकीत भाजपाची एकहाती सत्ता स्थापित करू : रामसिंग चव्हाण

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.१८ जुलै -**

भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण या भागाच्या आमदार ॲड. श्रीजया चव्हाण व जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख यांच्या आदेशान्वये भाजपा शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण यांनी दि.१६ जुलै रोजी शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषदेत नूतन शहर कार्यकारणी जाहीर केली आहे.

खासदार अशोक चव्हाण यांचे जवळचे विश्वासू भाजपा शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण यांनी शहर भाजपा नूतन कार्यकारणी जाहिर केली,करून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

रामसिंग चव्हाण यांनी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका होणार असून त्या अनुषंगाने सर्व पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी खांद्याला खांदा लावून मुदखेड नगर परिषदेची निवडणूक जिंकायची आहे व मुदखेड नगरपरिषदेवर भाजपाचा झेंडा फडकवायचा आहे आणि अशोक चव्हाण व श्रीजया चव्हाण यांचे विकासाचे स्वप्न पूर्ण करायचे आहे असे प्रतिपादन नवीन कार्यकारिणीला मार्गदर्शन करताना केले.



नूतन कार्यकारणी मध्ये शहर उपाध्यक्ष म्हणून गजानन कमळे ,युवा मोर्चा शहराध्यक्ष रामेश्वर आबादार,चिटणीस राजू बारतोंडे,सरचिटणीस प्रभाकर पांचाळ,विनोद चंद्रे, शहर उपाध्यक्ष मधुकर दवने,राहुल चिंतेवाड,उत्तम गीरी चिटणीस, सुधाकर सुर्यवंशी, शैलेश बोडके,महिला मोर्चा शहराध्यक्ष प्रियंका खंधारे,ओबीसी मोर्चा शहराध्यक्ष संतोष सावंत, सोशल मीडिया जयदीप चंद्रे, या सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी भाजपाचे माधव पाटील कदम,संजय आऊलवार,प्रविण काचावार,मुन्ना चांडक,प्रकाश बल्फेवाड, ऋशीकेश पारवेकर,संजय चव्हाण,जय राजवाडीकर,चांदु बोकेफोड,रतन चौदंते,पिटु बोडके,शिवा तोटेवार, दिनेश शर्मा, सर्वांच्या वतीने नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार व पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

# रेती तस्करांवर आता दंड- फौजदारीसह प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेची कारवाई होणार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१८ जुलै -**

राज्यभरामध्ये अवैध रेतीसह गौण खनिज उत्खनन वाहतूक व तस्करीचे वारंवार प्रकार घडत असतात. त्यामुळे महसुल व पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होते. राज्य शासनाने आता महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांना दंडासह फौजदारी कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेच्या तरतूदीचा शासन आदेश जारी केला आहे. त्यामुळे आता रेती तस्करीला आळा बसला जाईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

राज्यात गौण खनिजाबाबतचा विषय हा महसूल व वन विभागाकडून हाताळण्यात येतो. ज्यासाठी महाराष्ट्र गौण खनिज विकास व विनियमन नियम २०१३ तयार करण्यात आलेला आहे. रेती व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन, वाहतूक तसेच तस्करी यामुळे गुन्हेगारी कारवाया वाढत आहेत. त्यास प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील तरतुदीनुसार केवळ दंडात्मक कारवाई न करता संबंधिताविरुद्ध फौजदारी कारवाई म्हणजेच एफआयआर दाखल करण्याचे महसूल विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश राज्यपालाच्या आदेशाने महसूल व वन विभागाचे कार्यासन अधिकारी सदानंद मोहिते यांनी दि. १७ जुलै २०२५ रोजी जारी केले आहेत. तसेच या आदेशामध्ये महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायकव्यक्ती, व्हिडिओ पायरेट्स, अत्यावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणारे व्यक्ती व विघातककर्त्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम १९८१ मध्ये सुधारणा करीत रेती तस्करांचा समावेश करण्यात आला आहे.

# जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील रहा : सुनील सोनुले



**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.१८ जुलै -**

हदगाव शहरवासीयांनी दोन वेळा विश्वास दाखवून पालिकेची सत्ता एकहाती काँग्रेसच्या ताब्यात दिली त्यांच्या विश्वासाला सार्थ ठरत प्रत्येक नगरसेवकांनी व पदाधिकाऱ्यांनी जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी वार्डा-वार्डात जाऊन प्रयत्नशील राहावे अशा सूचना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी कार्यकारणी सदस्य तथा माजी उपनगराध्यक्ष,काँग्रेस नेते सुनील सोनुले यांनी पदाधिकारी व नगरसेवकांच्या बैठकीत दिल्या.

आगामी पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते सुनील सोनुले यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेस पक्ष कार्यालयात काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व माजी नगरसेवकांच्या बैठकीचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी बोलताना सुनील सोनुले म्हणाले की,शहरातील जनतेच्या विश्वासाला पात्र राहून त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी तुम्ही नेहमीच प्रयत्नशील असता यापुढे जाऊन आपण सर्वांनी मिळून नागरिकांच्या समस्या सोडविण्याला प्राधान्य द्यावे,आगामी होणाऱ्या पालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाचाच विजय होणार असून गुलाल आपलाच असल्याचे देखील सुनील सोनुले यांनी या बैठकीत सांगितले.

याप्रसंगी काँग्रेस पदाधिकारी व नगरसेवकांनी जनतेचे अनेक प्रश्न सुनील सोनुले यांच्या समोर मांडले ज्यात उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांची होणारी हेळसांड व असुविधा,तहसील कार्यालयातून पात्र निराधार,अपंग व सर्वच योजनेचे वेतन वाटपात होणारी दिरंगाई,राशन कार्डाचे वेळेवर वाटप न होणे व त्यामधील नाव वगळणे व नविन नाव टाकणे,शहरातील वाढत्या चोऱ्यांचे व दुचाकी वाहन चोरीच्या घटनेत तपास कामी पोलिसांची निष्क्रियता,शाळा व महाविद्यालयीन मुलींची छेडछाड,अल्पवयीन मुलांचे वाहान परवाना नसताना सुसाट वेगाने वाहन चालवण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसत आहे .शहरात फिल्टर पाण्याचे उर्वरित राहिलेले कामं,डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील संविधान प्रतिकृतीची नियमित न होणारी देखभाल व परिसर स्वच्छता,शहरात डास निर्मूलन फवारणी न झाल्याने डासाचे वाढते प्रमाण,शहरात रमाई योजनेचे जनजागरण योग्य रीतीने न झाल्याने अनेक नागरिक या योजने पासून वंचित राहिल्याच्या तक्रारी, बॉन्ड पेपरवर खरेदी केलेल्या प्रॉपर्टी धारकांना आवास योजनेचे लाभ मिळावेत,बौद्ध वस्तीतील झोपडपट्टी धारक व गायरान जमिनीवरील ३०,३५ वर्षांपासून वास्तव्यात असलेल्या नागरिकांना आवास व रमाई योजनेचा लाभ मिळावा यासह शहरविकास व जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी विविध निवेदने संबंधितांना देण्यात आली.

या बैठकीला व निवेदन देतांना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कार्यकारणी सदस्य तथा माजी उपनगराध्यक्ष सुनील सोनुले , काँग्रेस चे पदाधिकारी, युवक काँग्रेसचे पदाधिकारी यांच्यासह आजी -माजी नगराध्यक्ष, माजी उपाध्यक्ष , माजी नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रशिक्षणासाठी मंजूर निधीचा अद्याप वापर नाही

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.१८ जुलै -**

**आ. भीमराव केराम यांची विधानसभेत सरकारकडे जोरदार मागणी**

राज्याच्या पावसाळी अधिवेशनात औचित्याच्या मुद्द्यावर बोलताना किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव केराम यांनी सरकारकडे आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासंदर्भातील अत्यंत महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला.

केराम म्हणाले की, राज्य सरकारने दिनांक ८ फेब्रुवारी २०२३ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार राज्यातील आदिवासी विभागाच्या माध्यमातून आदिवासी विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकी (एपसळपशशीळपस) व वैद्यकीय (चशवळलरश्र) प्रशिक्षण देण्यासाठी ४ कोटी ८० लाख रुपयांची तरतूद केली होती. मात्र दुर्दैवाने दीड वर्ष उलटूनही या निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही आहे.

त्यांनी विधानसभेत सविस्तर माहिती देताना सांगितले की, राज्यातील विविध आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या ११ वी व १२ वीतील आदिवासी विद्यार्थ्यांना छएएढ व गएए परीक्षांसाठी विशेष प्रशिक्षण देणे आवश्यक होते. यासाठी शासन निर्णयाद्वारे नामांकित प्रशिक्षण संस्थांची नियुक्ती करून त्या विद्यार्थ्यांना मोफत व दर्जेदार मार्गदर्शन देण्याची योजना होती.

ही योजना राबवली गेली असती, तर एकूण ४८० आदिवासी विद्यार्थ्यांना याचा थेट लाभ मिळाला असता, असेही त्यांनी स्पष्ट केले. मात्र अद्याप या निधीचा योग्य उपयोग झाला नसल्यामुळे हे विद्यार्थी या संधीपासून वंचित राहिले आहेत, याची खंत आमदार केराम यांनी व्यक्त केली.

अध्यक्ष महोदय, शिक्षणाच्या संधी आणि स्पर्धा परीक्षांमध्ये मार्गदर्शन ही आदिवासी समाजाच्या मुलांसाठी जीवन बदलणारी बाब ठरू शकते. म्हणूनच माझी सरकारकडे मागणी आहे की, यावर्षी तरी संबंधित विभागाने नावाजलेल्या संस्थांची तातडीने नियुक्ती करून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जावे, अशी ठाम मागणी त्यांनी अधिवेशनात उपस्थित केली.

या मागणीला विरोधी बाकांतील आमदारांचेही समर्थन मिळाले असून, राज्य सरकारने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन लवकरात लवकर योग्य निर्णय घेण्याची गरज असल्याचे मत विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.

# परिक्रमा वेढ्याचे ८ ऑगस्ट रोजी प्रस्थान;भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि.१८ जुलै -**

श्री दत्तात्रेय संस्थान दत्त शिखर,माहूरगड येथील नारळी पौर्णिमा (रक्षाबंधन) परिक्रमा पंचकोशी वेढा यात्रा दिनांक ०८ ऑगस्ट रोजी दुपारी श्री दत्तात्रेय संस्थान दत्तशिखर,माहूरगड येथून दुपारी ०४ चार वाजता निघणार असून दुसऱ्या दिवशी शनिवारी दिनांक ०९ ऑगस्ट रोजी परत आहे.ज्या भाविकांना या परिक्रमेला यायचे असेल त्यांनी दत्तशिखर येथे शुक्रवारी दु.०३ वाजेपर्यंत उपस्थित राहावे राहावे, असे आवाहन संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.



श्री दत्तात्रेय संस्थान, दत्त शिखर माहूरगड येथील भगवान श्री दत्तात्रेय मंदिर येथे श्री दत्त कृपेने व श्री श्री १००८ प.पू.महंत श्री मधुसूदन भारती महाराज गुरू अच्युत भारती यांच्या कृपाशीर्वादाच्या मार्गदर्शनाखाली यावर्षी नारळी पौर्णिमा म्हणजेच रक्षाबंधन निमित्ताने साजरा करण्यात येणारा पंचक्रोशी अर्थात परिक्रमा यात्रा महोत्सवाला ०३ रोजी रविवार श्रावण शुक्लपक्ष नवमी रोजी अखंड दत्त नाम सप्ताहाने सकाळी ०६ वाजता पासून सुरुवात होणार असून, नारळी पौर्णिमा (रक्षाबंधन) परिक्रमा पंचकोशी वेढा यात्रा दिनांक ०८ ऑगस्ट रोजी श्रावण शुक्ल पक्ष चतुर्दशी श्री दत्तात्रेय संस्थान दत्तशिखर माहूरगड येथून दुपारी ०४ चार वाजता निघणार आहे व दुसऱ्या दिवशी शनिवारी दिनांक ०९ ऑगस्ट श्रवण पौर्णिमा रोजी श्री दत्तात्रेय संस्थान येथे परत येणार आहे. यात्रेला येणाऱ्या ज्या भाविक भक्तांना या परिक्रमेला यायचे असेल त्यांना दत्तशिखर मंदिर संस्थान येथे शुक्रवारी दुपारी ०३ वाजतापर्यंत उपस्थित राहून या परिक्रमा वेढ्यात सहभागी होता येणार आहे.१०ऑगस्ट रविवारी श्रावण कृष्णपक्ष प्रतिपदा रोजी काकडा आरतीने या अखंड दत्त नाम सप्ताहाची सकाळी ०६ वाजता समाप्ती होणार आहे. नारळी पौर्णिमा म्हणजेच रक्षाबंधन शनिवार, ९ ऑगस्ट रोजी आहे. या दिवशी, बहिणी आपल्या भावाला राखी बांधून त्यांचे औक्षण करतात आणि त्यांच्या दीर्घायुष्याची आणि सुखसमृद्धीची कामना करतात.

श्री क्षेत्र माहूरगड येथील श्री दत्तात्रेय संस्थान दत्त शिखर येथे दरवर्षी नारळी पौर्णिमा म्हणजेच रक्षाबंधनाची मोठी यात्रा भरते. संस्थानच्यावतीने परिक्रमा वेढा यात्रोत्सवाची जय्यत तयारी सुरू करण्यात आली असून, लाखोंच्या संख्येने भाविक भक्तांचा जनसागर देवदर्शनासाठी व वेढ्यात सहभागी होण्यासाठी दत्त गडावर उपस्थित होत असतो.०८ ऑगस्ट रोजी दुपारी ०४ वाजता निघणाऱ्या परिक्रमा वेढ्यात सहभागी होण्यासाठी भाविकांनी त्यापूर्वीच म्हणजे दुपारी ०३ वाजताच्या सुमारास उपस्थित राहण्याचे आवाहन, श्री दत्तात्रेय संस्थान, दत्त शिखर माहूरगड च्यावतीने करण्यात आले आहे.

**जाहिर प्रगटन**

नोंदिचा प्रकारःखरेदी
माहिती मिळालेचा दि.१४/०७/२५
फेरफाराचा दि.१५/०७/२५

लिहून देणारःदत्तात्रय धोंडीबा रा.भोकर (खाता क्र.२६८)यांचे गट/सर्व्हे क्रमांक ४८७लागवडी योग्य क्षेत्र १.९०४५हे.आर.चौ.मी पैकी लागवडी योग्य क्षेत्र ०.०१३६ हे.आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.हे त्यांनी

संमती देणारे खातेदारःकिशनराव नारायणराव सोनारीकर(खाता क्रमांकः-०)दस्त क्र.७८०/१९८३दि.२८/११/८३लिहून घेणारःसूर्यकांत दशरथराव सूर्यवंशी(खाता क्रमांक १०७००) गट/सर्व्हे क्रमांक४८७ लागवडीयोग्य ०.०१३६हे.आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.यांना दूय्यम निबंधक भोकर जिल्हा नांदेड यांचेकडील खरेदी दस्त क्रमांक ३८ दि.३०/०९/१९९२ प्रमाणेरक्कम रुपये १०००० घेवून खरेदी दिली.सबब खरेदी घेणाऱ्याचे नाव गाव नमूना नं ७/१२वर दाखल केले.फेरफारात हितसंबध आहे असे अधिकार अभिलेखावरुन फेरफाराच्या नोंदवहिवरुन मला वाटते उक्त फेरफारात तूमचा हितसंबध आहे असे मानण्यास संयूक्तिक कारण आहे.उपरोक्त जमिन आहे त्या गावचा ग्राम महसूल अधिकारी याद्वारे सूचना देत आहे हि सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत नोंदिसंबधी तूमची हरकत कोणतीही असल्यास ती तोंडी अथवा लेखी पाठविण्या फर्मावित आहे पंधरा दिवसाच्या आत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तूमची संमती आहे असे गृहित धरले जाईल.

**ग्राम महसूल अधिकारी**
**तलाठी साझा भोकर**